

कुलगुरु कै. वि. गं. तथा
दादासाहेब केतकर

।। विद्वान् सर्वत्र पूज्यते ।।





शिक्षणमहर्षी कै.डॉ.ग.श्री. खैर
तथा अण्णासाहेब खैर


पुणे विद्यार्थी गृहाचे मासिक

# समाचार

**Pune Vidyarthi Griha's 'Samachar' Magazine March 2017 - Pages - 52**

संपादक : श्री. सुभाष मल्लाप्पा जिर्गे    कार्यकारी संपादक : प्राचार्य हणमंत भोसले

* पुणे * वर्ष ६८ वे * अंक ५ * **मार्च २०१७** * किंमत रु. १०/- * वार्षिक वर्गणी रु. १००/-





विद्याभवन हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय, घाटकोपर शाखा, मुंबई येथे
वार्षिक पारितोषिक वितरण प्रसंगी प्रमुख पाहुणे शिक्षण निरिक्षक श्री. अनिल साबळे
यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करताना कार्याध्यक्ष श्री. सुभाष जिर्गे,
समवेत डावीकडून ज्येष्ठ संचालक प्राचार्य के. एन. शिरकांडे,
ज्येष्ठ संचालक प्राचार्य श्री. हणमंत भोसले, संचालक श्री. संजय गुंजाळ व श्री. अमोल जोशी,
कोषाध्यक्ष श्री. राजेंद्र बोऱ्हाडे व संचालक श्री. दिनेश मिसाळ

# ⁂ विद्याभवन हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय, घाटकोपर शाखा, मुंबई ⁂




पूर्व प्राथमिक इंग्रजी विभागाच्या वार्षिक पारितोषिक वितरण समारंभ प्रसंगी प्रमुख पाहुणे ज्येष्ठ संचालक प्राचार्य हणमंत भोसले यांचा सत्कार करताना ज्येष्ठ संचालक प्राचार्य के. एन. शिरकांडे, समवेत मान्यवर



वार्षिक पारितोषिक वितरण समारंभ प्रसंगी प्रमुख पाहुणे मा. श्री. विनायक कामत, अध्यक्ष संकल्प सेवा संघ यांचे पुष्पगुच्छ, शाल, श्रीफळ देऊन स्वागत करताना ज्येष्ठ संचालक प्राचार्य हणमंत भोसले, समवेत डावीकडून कोषाध्यक्ष श्री. राजेंद्र बोऱ्हाडे, संचालक डॉ. शं. पां. किंजवडेकर व ज्येष्ठ संचालक श्री. के. एन. शिरकांडे



वार्षिक पारितोषिक वितरण प्रसंगी प्रमुख पाहुण्या श्रीमती कविता कर्वे - वैद्य यांच्या हस्ते पारितोषिक स्वीकारताना एस. एस. सी. चा विद्यार्थी चि. सोहम लिमये, सोबत डावीकडून श्रीमती सरला नरेंद्रन, कोषाध्यक्ष श्री. राजेंद्र बोऱ्हाडे, ज्येष्ठ संचालक प्राचार्य के. एन. शिरकांडे, ज्येष्ठ संचालक प्राचार्य हणमंत भोसले, संचालक श्री. कृष्णाजी कुलकर्णी व श्री. दिनेश मिसाळ




इ. १० वी निरोप समारंभ प्रसंगी प्रमुख पाहुणे श्री. बाबासाहेब वाघमारे, मुख्य ग्रंथपाल, विधान भवन, यांचा सत्कार करताना ज्येष्ठ संचालक प्राचार्य के. एन. शिरकांडे, समवेत कोषाध्यक्ष श्री. राजेंद्र बोऱ्हाडे

संपादकीय

# कृतज्ञता

मनुष्य केवळ अन्नावर जगत नाही किंवा सर्व सुख साधने उपलब्ध असतील तसे त्यापासून सुख समाधान मिळेलच असे खात्रीने सांगता येत नाही. आपल्या मनाच्या अनेक आवश्यक गरजा असतात. त्याही आपल्या जीवनात फार मोठा आधार, आनंद व उत्साह देत असतात. लहान मुलांपासून ते थोरांपर्यंत वयोमानाप्रमाणे या गरजा वाढत व बदलत असतात. ज्याप्रमाणे लाकडाचे दोन तुकडे जोडायचे असतील तर प्रत्येकाचा थोडा थोडा भाग तासून एकमेकात बसवितात. त्यानंतर उत्तम सांधा तयार होतो. त्याप्रमाणे प्रत्येक माणसाने आपापले दोष जर थोडे थोडे तासून टाकले तर परस्पर प्रेमाचा सांधा खात्रीने उत्तम बसेल या करीता विचाराने आणि काळजीने वागणे जरुरीचे आहे.

मुनष्याच्या जगण्यासाठी असणाऱ्या अपेक्षांच्या तृप्तीकरता तो इतरांवर, भोवतालच्या माणसांवर म्हणजे ज्या समाजात आपले व्यक्तिमत्व वाढत असते, त्या समाजावर अवलंबून असतो. आपण केलेल्या कार्याचे इतरांनी कौतुक करावे, चांगले म्हणावे असे वाटते. मान-सन्मान व आदर घेण्याचे जीवनात अनेक प्रसंग येत असतात. परंतु आपण  दुसऱ्यांचा सन्मान केल्याने आपलाही सन्मान होतो. त्यामुळे आई, वडिल, गुरुजन यांना योग्य तो आदर वेळोवेळी दिला पाहिजे. प्रत्येक पिढीमध्ये सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक व वैचारिक वातावरणात फरक असतो. स्वाभाविकच त्यांच्या आचार विचारानेही थोडा फार फरक पडतो. त्यामुळे अशा प्रकारचा मानसन्मान व आदर देण्याघेण्यामध्येही फरक पडलेला दिसत आहे.

समाजात हल्ली दुर्मिळ होत चाललेला गुण म्हणजे कृतज्ञता. इतरांनी आपल्यासाठी जे केले ते त्यांचे कर्तव्यच होते. त्यात काय विशेष ? अशी तुच्छतेची भावना वाढत आहे. आई वडिल, गुरुजन, शिक्षणसंस्था, नातेवाईक, मित्र यांनी आपल्या करीता घेतलेल्या श्रमाची जाणीव व तिची अंशता परतफेड करण्याची वृत्ती नष्ट होत चालली आहे. इतरांनी आपल्याकरीता घेतलेल्या श्रमाची जाणीव ठेवणारे फार थोडे. आपल्या आजच्या स्थितीला कोण कारणीभूत आहे आणि त्यांच्या सहाय्याबद्दल, कष्टाबद्दल आपण काय कृतज्ञता दाखवली याचा आपल्या मनाशी विचार करणे आवश्यक आहे.

अलीकडे अनादराचे व तुच्छतेचे प्रमाण वाढत आहे. त्याला आपण बळी न पडता जीवनातला आनंद व उत्साह वृद्धिंगत करणाऱ्या महत्त्वाच्या गरजा व अपेक्षा इतरांच्या बाबतीमध्ये त्या आधी आपण पार पाडाव्यात मगच त्यांच्याकडून या चांगल्या गुणांची अपेक्षा करावी.



**जागतिक महिला दिन**
**८ मार्च २०१७**

# मुक्तांगण इंग्लिश स्कूल व कनिष्ठ महाविद्यालय

**कार्यवाह : प्रा. राजेंद्र कांबळे**
**प्र. प्राचार्या : सौ. नूतन बापट**
**प्र. मुख्याध्यापिका : सौ. उत्कर्षा केणी**

**आंतरशालेय मैदानी स्पर्धेत दैदिप्यमान यश**

दि. ३० व ३१ जानेवारी २०१७ रोजी महाराष्ट्रीय मंडळाच्या वतीने आयोजित केलेल्या **आंतरशालेय मैदानी स्पर्धेत मुक्तांगण इंग्लिश शाळेने सलग १० वर्षे सर्वसाधारण विजेतेपद पटकावण्याचा मान मिळविला आहे.**

या स्पर्धेत विनाअनुदानित ३० प्राथमिक शाळांमधून सुमारे ८०० विद्यार्थ्यांनी भाग घेतला होता. मुक्तांगण इंग्लिश शाळेतील एकूण २४ विद्यार्थ्यांनी आपली चमक दाखवत ही यशाची परंपरा कायम राखली आहे.

८ वर्षाखालील मुलांच्या ५० मीटर धावण्याच्या शर्यतीमध्ये चि. राघवेंद्र कुलकर्णीने ८.७२ सेकंद वेळ नोंदवून सुवर्णपदक मिळविले. यानंतर ४ बाय ५० मीटर रिले शर्यतीमध्ये चि. राघवेंद्र कुलकर्णी, चि. शौर्य घारगे, चि. ईशान जगताप, चि. समर्थ ढेपे यांनी ३६.९८ सेकंद वेळ नोंदवून अव्वल स्थानी राहून सुवर्णपदक मिळविले. कु. सई सोहनी, कु. मधुरा हगवणे, कु. अनुष्का संगा, कु. वेदिका जगताप या मुलींनी ४ बाय ५० मीटर रिले शर्यतीत रौप्य पदक मिळविले. १० वर्षाखालील ४ बाय ५० मीटर रिले शर्यतीमध्ये चि. अर्जुन देशमुख, चि. श्रीनाथ बदादे, चि. यश वैद्य व चि. सर्वेश पाटील या मुलांनी सुवर्णपदक जिंकले. कु. जिज्ञासा परदेशी हिला लांब उडीमध्ये ब्रॉंझ पदक मिळाले. १२ वर्षांखालील मुलांच्या १०० मीटर धावण्याच्या शर्यतीमध्ये चि. लौकिक मेलगेने १४.२० सेकंद अशी वेळ नोंदवून सुवर्णपदक मिळविले तसेच लांब उडी मध्येही त्याने रौप्य पदक मिळविले. चि. लौकिक मेलगे, चि. आर्य कदम, चि. रुद्र व्यास व चि. ओंकार खोपडे यांना ४ बाय ५० मीटर धावण्याच्या रिले शर्यतीत रौप्य पदक मिळाले.

दि. १७ व १८ ऑक्टोबर २०१६ रोजी पुणे गर्ल्स स्कूल स्पोर्ट्स असोसिएशनच्या सणस मैदानावर झालेल्या स्पर्धांमध्ये १२ वर्षे वयोगटाखालील धावण्याच्या स्पर्धेत कु. ईशा शिवाले (इ. ६ वी ड) हिला तृतीय क्रमांक मिळाला तर कु. सानिया कदम (इ. ५ वी ब) हिला द्वितीय क्रमांक मिळाला.

दि. २७ जानेवारी ते २९ जानेवारी २०१७ या कालावधीत गोवा येथे झालेल्या गोवा स्पोर्ट्स फेस्टिव्हल चॅम्पियनशिपमध्ये माध्यमिक विभागातील विद्यार्थिनी कु. कनिष्का ढोले (इ. ९वी ब) हिने गोळाफेक व थाळीफेक स्पर्धेत उत्कृष्ट फेकीसाठी सुवर्णपदक प्राप्त केले.

दि. ३० व ३१ जानेवारी २०१७ रोजी झालेल्या आंतरशालेय स्पर्धांत लाँग जंप स्पर्धेत कु. लौकिक मेलगे (स. ६वी क) याला प्रथम क्रमांक मिळाला. याच स्पर्धेत कु. आर्या कदम हिला द्वितीय तर कु. ओंकार खोपडे याला तृतीय क्रमांक मिळाला.

१०० मीटर धावण्याच्या स्पर्धेत कु. लौकिक मेलगे (इ. ६वी क) याने प्रथम क्रमांक पटकावला.

रिले स्पर्धेत शाळेला द्वितीय क्रमांक मिळाला.

दि. ८ फेब्रुवारी २०१७ रोजी झालेल्या जिल्हास्तरीय किक बॉक्सिंग चॅम्पियनशिप

**स्पर्धेत माध्यमिक विभगातील विद्यार्थिनी कु. पूर्वा अंबवले (इ. ९वी अ) हिने सुवर्णपदक व रु. १,२००/- रोख बक्षीस मिळविले.**

**नॅशनल सायन्स ऑलिम्पियाड (सन २०१६ - १७) निकाल**

परीक्षेच्या प्रथम फेरीचे निकाल जाहीर झाले. सुवर्णपदक प्राप्त विद्यार्थ्यांची द्वितीय फेरीसाठी निवड झालेली आहे.

| विद्यार्थ्याचे नाव | इयत्ता | पदक |
|---|---|---|
| कु. अर्जुन खेडेकर | इ. ५वी ब | सुवर्ण |
| कु. ऋचा रानडे | इ. ५वी ड | रजत |
| कु. सोहम कुलकर्णी | इ. ५वी बक | कांस्य |
| कु. अर्णव गिलानकर | इ. ६वी अ | सुवर्ण |
| कु. ईशान प्रसादे | इ. ६वी क | रजत |
| कु. सारिका आंबेडकर | इ. ६वी अ | कांस्य |
| कु. सोहम पंडित | इ. ७वी क | सुवर्ण |
| कु. हर्षद पवार | इ. ७वी क | रजत |
| कु. अर्णव गद्रे | इ. ७वी अ | कांस्य |
| कु. शुभंकर पाटील | इ. ८वी अ | सुवर्ण |
| कु. मयूर पाटील | इ. ८वी इ | रजत |
| कु. निरंजन विरकर | इ. ८वी अ | कांस्य |
| कु. यशराज भाईक | इ. ९वी इ | सुवर्ण |
| कु. प्रियांका कुलकर्णी | इ. ९वी इ | रजत |
| कु. देवेन कालगावकर | इ. ९वी इ | कांस्य |
| कु. ईशानी अत्रे | इ. १०वी क | सुवर्ण |

दिनांक १४ फेब्रुवारी २०१७ रोजी झालेल्या पुणे गर्ल्स स्कूल स्पोर्ट्स असोसिएशन स्पर्धेमध्ये कु. कनिष्का ढोले (इ. ९वी ब) हिने गोळाफेक व थाळीफेक मधील 'बेस्ट थ्रो' साठी बक्षीस मिळविले.

**WTSKF शी संलग्न असलेल्या 'विनर्स कराटे असोसिएशन' तर्फे भरलेल्या 'इन्व्हिटेशनल स्टेट कराटे चॅम्पियनशिप २०१७' मध्ये कु. आदिती कुलकर्णी (इ. ८वी अ) हिने 'इंडिव्हिज्युअल काता इव्हेंट' मध्ये सुवर्णपदक मिळविले. तसेच इंडिव्हिज्युअल आणि टीम काता इव्हेंटमध्ये रजतपदके प्राप्त केली.**

**'पाश्' या जर्मन भाषा संस्थेतर्फे** दि. १ फेब्रुवारी ते ४ फेब्रुवारी २०१७ या कालावधीत आशियातील प्राचार्यांचे चर्चासत्र बँकॉक येथे आयोजित करण्यात आले होते. प्र. प्राचार्या सौ. नूतन बापट यांना या चर्चासत्रात सहभागी होण्याची संधी मिळाली. आशियातील एकूण १२१ प्राचार्य या चर्चासत्रास उपस्थित होते. यावेळी 'E-Learning and Digital Learning in Schools of Asia' या विषयावर सविस्तर चर्चा करण्यात आली. विविध शालेय उपक्रमांबाबत ही चर्चा झाली.

**प्रजासत्ताक दिन**

दि. २६ जानेवारी २०१७ रोजी भारताचा ६८ वा प्रजासत्ताक दिन उत्साहात साजरा झाला. **यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून सुप्रसिध्द वकील व पुणे विद्यार्थी गृहाचे माजी विद्यार्थी ॲड. शरद चंद्रचूड व त्यांच्या पत्नी सौ. मीरा चंद्रचूड उपस्थित होत्या.**

प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते ध्वजारोहण झाले. संस्थेचे कार्याध्यक्ष श्री. सुभाष जिर्गे, कुलसचिव श्री. सुनील रेडेकर, संचालक प्रा. राजेंद्र कडुसकर, श्री. आनंद कुलकर्णी, श्री. रमेश कुलकर्णी व श्री. कृष्णाजी कुलकर्णी तसेच प्र. मुख्याध्यापिका सौ. उत्कर्षा केणी, प्र. प्राचार्या सौ. नूतन बापट, सौ. मीना राणे, माध्यमिक विभागाच्या पर्यवेक्षिका सौ. सायली धाक्रस व सौ. एव्हरील परेरा, संस्थेच्या विविध शाखांमधील प्राचार्य आणि माजी विद्यार्थी व पालक उपस्थित होते.

राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सुरूवात झाली. त्यानंतर शाळेच्या राष्ट्रीय छात्र सेनेच्या विद्यार्थ्यींनी उत्कृष्ट संचलन सादर केले. विद्यार्थी प्रतिनिधी चि. अथर्व शिंदे याने संविधानाची प्रतिज्ञा घेतली व उपस्थित विद्यार्थ्यांनी त्याचा पुनरुच्चार केला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक, प्रमुख पाहुण्यांचे व उपस्थित मान्यवरांचे स्वागत प्र. प्राचार्या सौ. नूतन बापट यांनी केले. आपल्या प्रास्ताविकामध्ये

प्र. प्राचार्या सौ. नूतन बापट यांनी आपल्या तिरंग्याचे महत्त्व विशद केले व तिरंग्याचा मान सर्वांनीच राखावा असे सांगितले. प्रमुख पाहुण्यांचा परिचय कनिष्ठ महाविद्यालयाच्या प्रमुख सौ. मीना राणे यांनी करून दिला. कार्याध्यक्ष श्री. सुभाष जिर्गे यांनी प्रमुख पाहुणे ॲड. शरद चंद्रचूड यांचा सत्कार केला व सौ. मीरा चंद्रचूड यांचा सत्कार प्र. मुख्याध्यापिका सौ. उत्कर्षा केणी यांनी केला.

प्रमख पाहुण्यांच्या हस्ते शाळेतील गुणवान विद्यार्थ्यांना व राष्ट्रीय छात्र सेनेमध्ये विविध स्पर्धांत यशस्वी झालेल्या विद्यार्थिनींना बक्षीसे देण्यात आली. तसेच विद्यार्थिनी कु. समृध्दी बोंगाळे हिचा पालकांसह विशेष सत्कार करण्यात आला. कु. समृध्दी बोंगाळे ही विद्यार्थिनी दिल्ली येथील थल सैनिक कॅम्पमध्ये सहभागी झाली होती. याप्रसंगी राष्ट्रीय छात्र सेनेच्या कॅडेट्सना रँक्स देण्यात आल्या.

शाळेच्या चार कुलांतील विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या हस्तलिखितांचेही प्रकाशन यावेळी प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते करण्यात आले. बक्षीसपात्र विवेकानंद कुलास जनरल चॅम्पियनशिप व सांस्कृतिक चॅम्पियनशिपच्या ट्रॉफीज (मानचिन्हे) देण्यात आल्या.

आपल्या भाषणात प्रमुख पाहुणे ॲड. शरद चंद्रचूड म्हणाले की, शिक्षक हे समाजाला योग्य आकार देण्याचे काम करतात. शिक्षणामध्ये शिक्षक हे विद्यार्थी आणि पालकांमध्ये महत्त्वाचा दुवा असतात. ॲड. चंद्रचूड हे संस्थेचे माजी विद्यार्थी असल्याने त्यांनी संस्थेबद्दल आपली विशेष कृतज्ञता व्यक्त केली. तसेच त्यांनी रु. ५,०००/- ची देणगी शाळेच्या ग्रंथालयास दिली.

पूर्व-प्रथमिक विभागाच्या शिक्षक प्रतिनिधी सौ. जयश्री दायमा यांनी आभारप्रदर्शन केले. यावेळी विद्यार्थ्यांना खाऊही देण्यात आला. वंदे मातरम्‌ने कार्यक्रमाची सांगता झाली.

### इयत्ता १०वी निरोप समारंभ

दि. ११ फेब्रुवारी २०१७ रोजी इ. १०वी च्या विद्यार्थ्यांसाठी निरोप समारंभ आयोजित करण्यात आला होता. अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या सभागृहात सदर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. प्र. प्राचार्या सौ. नूतन बापट, उपमुख्याध्यापिका सौ. हेमांगिनी इनामदार, पर्यवेक्षिका सौ. सायली धाक्रस, सौ. एव्हरील परेरा, शिक्षक प्रतिनिधी सौ. माणिक जोशी, इयत्ता १०वी च्या वर्गशिक्षिका सौ. सुप्रिया देशकुलकर्णी, सौ. विजया काळे, सौ. शर्मिला केळकर, सौ. मंजिरी ओझरकर व सौ. अपर्णा रणधीर या व्यासपीठावर उपस्थित होत्या.

पर्यवेक्षिका सौ. सायली धाक्रस यांनी एस.एस.सी. बोर्डाच्या परीक्षेविषयी, परीक्षेतील गैरप्रकार टाळण्या विषयी आणि सर्वसामान्यपणे आरोग्याची काळजी घेणे कसे आवश्यक आहे याविषयी मुलांना मार्गदर्शन केले. शिक्षका सौ. मंजिरी ओझरकर यांनी शिक्षकांच्या वतीने मनोगत व्यक्त केले.

प्रभारी प्राचार्या सौ. नूतन बापट व उपमुख्याध्यापिका सौ. हेमांगिनी इनामदार यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

प्रत्येक तुकडीतील एकेका विद्यार्थ्याने आपले मनोगत व्यक्त केले आणि शाळेतील अविस्मरणीय आठवणींना उजाळा दिला.

शाळेच्या बास्केटबॉल कोर्टवर विद्यार्थी व शिक्षकांसाठी अल्पोपाहाराचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.

### मराठी दिवस

दि. १४ व १५ फेब्रुवारी २०१७ रोजी प्राथमिक विभागातील इ. १ली ते ४ थी च्या विद्यार्थ्यांसाठी मराठी दिवसाचे आयोजन करण्यात आले होते. इ. १ली च्या विद्यार्थ्यांना बडबड गीते, इ. २री साठी कविता, इ. ३री च्या विद्यार्थ्यांसाठी संस्कारक्षम बोधकथा व इ. ४थी च्या विद्यार्थ्यांसाठी नाट्यछटा किंवा पोवाडा असे विषय देण्यात आले होते. या दिवशी विद्यार्थ्यांनी महाराष्ट्रीयन पदार्थ डब्यात आणले होते. या दिवशी प्रार्थना, प्रतिज्ञा, संविधान इ. सगळे मराठीतच घेण्यात आले व मराठी दिनाचे महत्त्व विद्यार्थ्यांना सांगण्यात आले.

दि. २२ डिसेंबर २०१६ रोजी थोर गणितज्ज्ञ श्रीनिवास रामानुजन यांच्या १०० व्या जयंतीनिमित्त आबासाहेब गरवारे येथे महाराष्ट्र कनिष्ठ महाविद्यालया मधील गणितीय संस्थेने कार्यशाळा आयोजित केली होती. या कार्यशाळेस शिक्षिका सौ. ज्योती देसाई उपस्थित होत्या.

दि. ४ फेब्रुवारी २०१७ रोजी संध्याकाळी ६.३० ते ८.३० या वेळेत ॲस्ट्रॉनॉमिक क्लबतर्फे चंद्र व शुक्र यांच्या कला दुर्बिणीतून पाहण्याची संधी शाळेच्या क्रीडांगणावर उपलब्ध करून दिली होती. विद्यार्थी, पालक व शिक्षक यांनी उत्साहाने या कलादर्शनाचा लाभ घेतला.

दि. ५ फेब्रुवारी २०१७ रोजी अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या सभागृहात इ. १०वी व १२वी च्या विद्यार्थी व पालकांसाठी श्री. दीपक शिंदे यांचे, 'इ. १०वी व १२ वी च्या बोर्ड परीक्षेत जास्तीत जास्त गुण कसे मिळवाल?' या विषयावर मार्गदर्शनपर भाषण आयोजित करण्यात आले होते. ***

# महाराष्ट्र मुद्रण तंत्र संस्था, पुणे

**कार्यवाह : प्रा. राजेंद्र कांबळे**

**प्र. प्राचार्य : परमेश्वर. व्ही. शिंदे**

### शैक्षणिक सहल

* द्वितीय वर्षामधील प्रिंटिंग टेक्नॉलॉजीच्या विद्यार्थ्यांची ॲक्युप्रिंट सिस्टिम, तळोजा एम.आय.डी.सी. आणि युगेन प्रिंटिंग ॲण्ड पॅकेजिंग तळवडे येथे शैक्षणिक सहलीचे आयोजन करण्यात आले होते. पहिले ३० विद्यार्थी ४ फेब्रुवारी २०१७ रोजी गेले होते आणि बाकीचे ३० विद्यार्थी ११ फेब्रुवारी २०१७ रोजी गेले.

ॲक्युप्रिंट सिस्टिम, मुंबई प्रत्येक वर्षी ही शैक्षणिक सहल महाराष्ट्र इन्स्टिट्यूट ऑफ प्रिंटिंग टेक्नॉलॉजी या महाविद्यालयासाठी आयोजित करते.

शैक्षणिक सहली दरम्यान इलेक्ट्रोमेकॅनिकल एनग्रेव्हिंग, लेसर एनग्रेव्हिंग, रोबोटिक्स, फ्लेक्झोग्राफी प्रिंटिंग इ. विविध संकल्पना विद्यार्थ्यांनी समजून घेतल्या.

सहलीमध्ये खालील शिक्षक व शिक्षिका कर्मचाऱ्यांनी उत्स्फूर्त सहभाग घेऊन सहलीचे नियोजन उत्तम केले. प्रा. पी. व्ही. शिंदे, प्रा. ए. ए. रावेतकर, श्री. एस. बी. सहस्त्रबुद्धे, श्री. एस. वरखडे, श्री. व्ही. व्ही. बोत्रे, श्री. एस. वासकर, सौ. पी. ए. पेटकर

* दि. २१ जानेवारी २०१७ रोजी प्रथम वर्ष प्रिंटिंग टेक्नॉलॉजीचे ६० विद्यार्थी 'युनिक लेबल्स, पुणे' या स्क्रिन प्रिंटिंग मधील अग्रगण्य कंपनीला भेट देण्यास गेले होते. श्री. एस. बी. सहस्त्रबुध्दे व श्री. एस. के. बंडगर हे शिक्षक प्रतिनिधी विद्यार्थ्यांच्याबरोबर होते.

* दि. १४ जानेवारी २०१७ रोजी द्वितीय वर्ष प्रिंटिंग टेक्नॉलॉजीचे ६० विद्यार्थी 'एन. आर. एंटरप्रायजेस, माणिकबाग, पुणे' व 'अथर्व प्रिंट क्रिएशन' नांदेड फाटा, पुणे या दोन कंपनीस भेट देण्यास गेले होते. बुक बाईंडिंग व वेब ऑफसेट या विषयांची उपयुक्त माहिती विद्यार्थ्यांना मिळाली. श्री. एस. पी. बावीस्कर व श्री. एस. बी. वरखडे हे शिक्षक प्रतिनिधी विद्यार्थ्यांबरोबर होते.

* दि. २० जानेवारी २०१७ रोजी 'अभिनव कला महाविद्यालय, टिळक रोड, पुणे येथील इंटरमिजिएट कमर्शियल कोर्स च्या ५२ विद्यार्थ्यांनी महाराष्ट्र मुद्रण तंत्र संस्थेस शैक्षणिक भेट दिली.

### अतिथी व्याख्यान

दि. २१.१.२०१७ रोजी श्री. अमेय सोहोनी, टेक्निकल सेल्स एक्सिक्युटिव, मोनोटेक सिस्टीम, मुंबई यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. अंतिम वर्षामधील विद्यार्थ्यांना फ्लेग्जिबल पॅकेजिंग या विषयाची माहिती मिळाली.

### प्लेसमेंट २०१६ - २०१७

फेब्रुवारी महिन्यामध्ये अंतिम वर्षातील विद्यार्थ्यांची प्लेसमेंट विविध कंपन्यांमध्ये झाली. 'कॅनपॅक ट्रेंडस् प्रायव्हेट लिमिटेड', अहमदाबाद येथे २ विद्यार्थी व २ विद्यार्थिनी यांची निवड झाली. त्यांना दरमहा रु. १३,०००/- वेतन देण्यात आले. ***

## वासुदेव गोपाळ कोकजे सदाचार वसतिगृह, पुणे

**संचालक : श्री. रमेश कुलकर्णी**

**व्याख्यान**

दि. ५.२.२०१७ रोजी विद्यार्थ्यांसाठी टोकियोमध्ये झालेल्या रिओ पॅरा ऑलिंपिक २०१६ च्या पोहण्याच्या स्पर्धेत भाग घेऊन ९वा क्रमांक मिळविणारे श्री. सुयश नारायण जाधव यांचे व्याख्यान आयोजित केले होते. त्यांनी आतापर्यंत राज्य व जागतिक स्तरावर एकूण ९६ पदके मिळविली आहेत.

श्री. सुयश नारायण जाधव यांनी आपल्या व्याख्यानात जीवनात यशस्वी होण्यासाठी आत्मविश्वास, एकाग्रता व सातत्य हे गुण आपणाकडे असणे आवश्यक आहेत तसेच आपणाकडे ज्या गोष्टी नाहीत त्याचा विचार न करता आपणाकडे ज्या गोष्टी आहेत त्यांचा योग्य वापर करून आपण जीवनात उत्तम यश संपादन करू शकतो असा संदेश दिला. तसेच विद्यार्थ्यांच्या विविध प्रश्नांना समर्पक उत्तरे देऊन त्यांचे समाधान केले. ***

## अभियांत्रिकी व तंत्रज्ञान महाविद्यालय, पुणे

**संचालक : श्री. राजेंद्र गो. कडुसकर**

**प्राचार्य : प्रा. योगेश नेरकर**

**अभिनंदनीय**

प्रिंटिंग विभागाच्या चार विद्यार्थ्यांनी SGIA (Speciality Graphic Imaging Association) लास वेगास, (USA) येथील TOM Frecska Student Printing Competition मध्ये प्रा. सौ. लक्ष्मी सपकाळ - अधिव्याख्याता प्रिंटिंग इंजिनिअरिंग यांच्या मार्गदर्शनाखाली सहभाग घेतला होता. त्यामध्ये त्यांच्या सादरीकरणाला ॲवार्ड ऑफ एक्सलन्स - प्रथम क्रमांक मिळाला. विद्यार्थी चि. हेमंत मांडवडे, चि. सूरज गिरी, चि. प्रसाद मोरबाळे, चि. नचिकेत गावंडे या सर्वांना मानचिन्ह (ट्रॉफी) आणि प्रमाणपत्र देण्यात आले. त्यांनी केलेल्या कामाचे स्वरुप पुढीलप्रमाणे -

कॅनव्हास पेपरवर चार रंगी स्क्रीन प्रिंटिंगने पक्षाच्या चित्राची छपाई केली. त्यामध्ये कॅनव्हास पेपरवर प्रिंटिंग करणे अवघड असते तरीही ते मुलांनी साकार करुन दाखविले. त्यामुळे या चौघांचे सर्वत्र कौतुक होत आहे. **संस्थेच्यावतीने त्यांचे हार्दिक अभिनंदन !**

***

### विशेष अर्थसहाय्य

**ॲटलास कॉपको (इंडिया) लिमिटेड यांचेकडून विद्यार्थ्यांना रु. ९८,०००/- चे अर्थसहाय्य**

पुणे विद्यार्थी गृहाच्या अभियांत्रिकी व तंत्रज्ञान महाविद्यालय, पुणे येथील विद्यार्थी राष्ट्रीय स्तरावर होणाऱ्या बाहा व इ-बाहा या स्पर्धांमध्ये दरवर्षी सहभागी होतात व यश मिळवितात. मागील वर्षी इ-बाहा स्पर्धेत या विभागातील विद्यार्थ्यांना प्रथम क्रमांकाचे पारितोषिक मिळालेले होते. या सर्व बाबींचा विचार करुन विद्यार्थ्यांना चार चाकी वाहनांच्या 'डिझाईन व फॅब्रिकेशन' कामासाठी मदत करावी, या उद्देशाने ॲटलास कॉपको (इंडिया) लिमिटेड या बहुराष्ट्रीय कंपनीने रु. ९८,०००/- एवढ्या मोठ्या रकमेची मदत दिलेली आहे. या नामांकित कंपनीचे उपाध्यक्ष (मनुष्यबळ विकास) श्री. माणिकराव पाटील यांनी विद्यार्थ्यांना ही रक्कम मिळणेसाठी सहकार्य केले.

**संस्थेतर्फे त्यांचे हार्दिक आभार !**

***

# विज्ञान महाविद्यालय, पुणे

**संचालक : प्रा. राजेंद्र सं. कांबळे**
**प्र. प्राचार्या : सौ. सुरेखा देशमुख**

महाराष्ट्र राज्य माहिती आयोग, मुंबई यांच्या वतीने ''Sexual Harassment of Women at Workplace'' (Prevention, Prohibition and Redressal) Act, २०१३ (कामाच्या ठिकाणी महिलांचा होणारा लैंगिक छळ (प्रतिबंध, मनाई व निवारण) कायदा, २०१३) या विषयावर दि. २ फेब्रुवारी २०१७ रोजी सेंट मिराज कॉलेज, पुणे येथे एक दिवसीय कार्यशाळा आयोजित केली होती. या कार्यशाळेस महाविद्यालयाच्या प्रतिनिधी प्रा. सौ. प्रियांका खुटवड यांनी सहभाग घेतला. कार्यशाळेत सौ. विजया रहाटकर यांनी संरक्षण, प्रतिबंध आणि निवारण संबंधीची माहिती दिली. तसेच महाविद्यालयात अंतर्गत तक्रार निवारण समिती स्थापन करण्याबाबत मार्गदर्शन केले.

यासंदर्भात आपल्या महाविद्यालयात सर्व विद्यार्थी व विद्यार्थिनींसाठी दि. २७ फेब्रुवारी २०१७ रोजी कार्यशाळा आयोजित केली होती. या कार्यशाळेत विद्यापीठातील कु. संध्या गवळी (Ph.D. Research Topic - Gender & Women) यांनी विद्यार्थ्यांना उत्तम मार्गदर्शन केले. तसेच विद्यार्थ्यांनीही त्यांना छान प्रतिसाद दिला. महाविद्यालयामध्ये यासंदर्भातील तक्रार नोंदविण्यासाठी ''महिला तक्रार निवारण'' पेटीचे अनावरण कु. संध्या गवळी यांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमास समितीच्या अध्यक्षा प्र. प्राचार्या सौ. सुरेखा देशमुख, प्रा. सौ. स्वाती जोशी, प्रा. सौ. प्रियांका खुटवड, शिक्षकेतर प्रतिनिधी सौ. क्षमा देव, विद्यार्थिनी प्रतिनिधी कु. रसिका उबाळे (UG), कु. विभावरी देवकर (PG) या सदस्यांसह सर्व शिक्षक व शिक्षकेतर सेवक उपस्थित होते. कार्यक्रमाअंती उपस्थितांसाठी चहापानाचे आयोजन करण्यात आले होते.

### विद्यापीठ प्रायोगिक परीक्षा आरंभ

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या प्रथम वर्ष बी. एस्सी. (संगणकशास्त्र) च्या प्रायोगिक परीक्षा दि. २२ फेब्रुवारी २०१७ ते दि. १ मार्च २०१७ या कालावधीमधे झाल्या. द्वितीय व तृतीय वर्ष बी. एस्सी. (संगणकशास्त्र) अंतर्गत चाचणी परीक्षा प्रमुख व संगणक विभागाच्या प्रा. सौ. प्रियांका खुटवड यांच्या देखरेखीखाली दि. २० फेब्रुवारी २०१७ ते दि. २७ फेब्रुवारी २०१७ या कालावधीमध्ये सुरळीत पार पडल्या.

### कठीण विषयांचे मार्गदर्शन योजना

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ अंतर्गत विद्यार्थी कल्याण मंडळातर्फे विद्यार्थ्यांना कठीण विषयांचे मार्गदर्शन करण्यात येते. यामध्ये प्रथम वर्ष बी. एस्सी. (संगणकरशास्त्र) या अभ्यासक्रमासाठी Electronics या विषयासाठी प्रा. रमाकांत भुजबळ, Programming in C (CS- I) या विषयासाठी महाविद्यालयाच्या संगणकशास्त्राच्या विभाग प्रमुख प्रा. सौ. रेखा जोशी व या DBMS विषयासाठी प्रा. सौ. शिल्पा पवळे यांचे विद्यार्थ्यांना मौल्यवान मार्गदर्शन लाभले.

### प्लेसमेंट सेल

प्लेसमेंट ॲक्टिव्हीटी अंतर्गत महाविद्यालयामध्ये विविध IT कंपनीजना आमंत्रित करण्यात येते. शैक्षणिक वर्ष २०१६ - १७ साठी माहे फेब्रुवारी २०१७ मध्ये झालेल्या पदव्युत्तर अभ्यासक्रम एम. एस्सी. (संगणकशास्त्र) ची माहिती पुढील प्रमाणे.

| कंपनीचे नाव | निवड झालेल्या विद्यार्थ्यांची संख्या |
|---|---|
| CueLogic | १ |
| DSM Technology | १ |
| FinTech | १ |
| VirtuSystems | १ |
| Proserindustry | ४ |
| MachBiz Marketers | १ |

***

# विद्याप्रशाला हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय
## तळेगाव अंजनेरी, ता. जि. नाशिक
**संचालक : श्री. अमोल जोशी**
**प्राचार्य : श्री. अशोक नारायण ढिवरे**

### ६८ वा प्रजासत्ताक दिन उत्साहात संपन्न

दि. २६ जानेवारी २०१७ रोजी भारताचा ६८ वा प्रजासत्ताक दिन उत्साहात संपन्न झाला. ध्वजारोहणाचे राष्ट्रीय कर्तव्य अध्यक्ष प्राचार्य श्री. अशोक ढिवरे, पालक - शिक्षक संघाचे अध्यक्ष व उपाध्यक्ष, तळेगांव ग्रामपंचायतीचे सरपंच व इतर मान्यवरांनी पार पाडले.

स्वागत गीतानंतर कॉपीमुक्त अभियान प्रतिज्ञेचे वाचन प्रा. जी. एन. जाधव यांनी केले. या प्रसंगी फेब्रुवारी - मार्च २०१७ मध्ये इ. १० वी व इ. १२ वीच्या विद्यार्थ्यांनी परीक्षेत कोणत्याही स्वरुपाची कॉपी करणार नाही अशी प्रतिज्ञा घेतली.

भूगोल प्रज्ञाशोध परीक्षा व सामान्यज्ञान परीक्षेत घवघवीत यश संपादन करणाऱ्या विद्यार्थ्यांची पारितोषिके प्रा. एम. गोऱ्हे यांनी घोषित केली. सुवर्ण, रौप्य व कांस्य अशी पदके देऊन प्राचार्यांनी विद्यार्थ्यांना गौरविले. विविध परीक्षांसंबंधी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन व प्रोत्साहन देणाऱ्या प्रा. पी. एस. सूर्यवंशी यांना 'उपक्रमशील शिक्षक' म्हणून गौरविण्यात आले.

कार्यक्रमाच्या शेवटी अध्यक्ष प्राचार्य श्री. अशोक ढिवरे यांनी प्रजासत्ताक दिनाविषयी आपले अध्यक्षीय मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमास गावातील प्रतिष्ठित नागरीक, ग्रामस्थ, माजी विद्यार्थी, शिक्षकवर्ग, शिक्षकेतर सेवक, विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. आर. एम. जगताप यांनी तर आभार प्रदर्शन प्रा. पी. एस. सूर्यवंशी यांनी केले.

### धावणे स्पर्धेत सुवर्णपदक

मीनाताई ठाकरे स्टेडियम (पंचवटी) येथे संपन्न झालेल्या पहिल्या राष्ट्रीय रुरल ग्रामीण ऑलिम्पिक असोसिएशन स्पर्धेत दि. ११.११.२०१७ ते १३.११.२०१६ दरम्यान घेण्यात आलेल्या धावणे स्पर्धेमध्ये धावपट्टू कु. सुवर्णा लक्ष्मण सदगीर ही १७ वर्षे वयोगटात १५०० मी. धावणे स्पर्धेत, कु. रोहिणी निवृत्ती सोपनर ही १७ वर्षे वयोगटात ३००० मी. धावणे स्पर्धेत प्रथम क्रमांक पटकावून तिने सुवर्णपदक मिळविले. या दोघींना क्रीडाशिक्षक श्री. संजय जोशी यांचे मार्गदर्शन लाभले.

या स्पर्धेत भारतातून महाराष्ट्र, गुजरात, दिल्ली, उत्तरप्रदेश हरियाणा, तामिळनाडू, पाँडेचरी, आंध्रप्रदेश, छत्तीसगड या राज्यातील ४५० खेळाडूंचा सहभाग होता. ऑलिंपिक असोसिएशनचे प्रमुख जे. पी. वर्मा या स्पर्धेला स्वतः हजर होते.

यशस्वी खेळाडूंचे संस्था प्रमुख, तत्कालीन प्राचार्या सौ. शैलजा पाटील, मुख्याध्यापक श्री. अशोक ढिवरे, पर्यवेक्षक श्री. राजेंद्र ढेरगे तसेच शिक्षक बंधू भगिनी यांनी अभिनंदन केले. यशस्वी खेळाडूंना क्राडीशिक्षक श्री. संजय जोशी यांचे मार्गदर्शन लाभले.

### प्रयोगशाळा योगदान

प्रयोगशाळेमध्ये वैज्ञानिकांच्या छायाचित्रांचे बॅनर्स, फ्लेक्स, फोटोग्राफ लावण्यासाठी गणेशगांवचे सरपंच श्री. भिमराव कापसे तसेच श्री. तानाजी पगार, श्री. नंदू पगार, श्री. कैलास पगार, श्री. अशोक पगार व सौ. स्वाती भावसार यांनी एकूण रु. २१,०००/- ची देणगी दिली. सदर देणगी मिळवून फ्लेक्स, फोटोग्राफ बनविणे यासाठी प्रयोगशाळा, सहाय्यक श्री. शंकर गबाजी पगार यांनी परिश्रम घेतले. **विद्यालय व संस्थेच्यावतीने देणगीदारांचे आभार**.

### वार्षिक पारितोषिक वितरण समारंभ २०१७

दि. ४.२.२०१७ रोजी वार्षिक पारितोषिक वितरण समारंभ साजरा करण्यात आला. कार्यक्रमाचे पाहुणे संचालक डॉ. निहार वाळिंबे व अध्यक्ष संचालक श्री. अमोल जोशी हे होते. संचालक श्री. संजय गुंजाळही उपस्थित होते. स्वागत गीताने व सरस्वती पूजनाने कार्यक्रमाची सुरुवात झाली. चित्रकला प्रदर्शनाचे उद्घाटन पाहुण्यांचे हस्ते करण्यात आले. विद्यार्थिनी

कु. नंदा नामदेव घुलुम (इ. ९ वी) हिच्या वारली चित्रांच्या कौशल्याबद्दल संचालक मंडळाने रु. ५००/- चे रोख पारितोषिक देऊन कौतुक केले. अहवाल वाचन श्री. एस. एस. जाधव यांनी केले. क्रीडा स्पर्धा, बौध्दिक स्पर्धा, शालाबाह्य स्पर्धा, वक्तृत्व स्पर्धा तसेच विविध विषयामध्ये प्राविण्य मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांना प्रमुख पाहुण्यांच्या व संचालक यांच्या हस्ते बक्षीसे देऊन गौरविण्यात आले. क्रीडा व बौध्दिक क्षेत्रातील बक्षीसांचे वाचन श्री. एस. जोशी व सौ. कोठावदे यांनी केले.अर्थव्याजविनियोगाचे वाचन प्रा. सी. एम. गोऱ्हे यांनी केले.

राज्यस्तरीय भूगोल प्रज्ञाशोध परिक्षेत ज्यु. कॉलेजच्या विद्यार्थिनींनी घवघवीत यश मिळवून सुवर्ण, रजत व कांस्य पदके प्राप्त केली. त्यांना मार्गदर्शन करणारे प्रा. प्रशांत सुर्यवंशी यांचा सत्कार पाहुण्यांच्या हस्ते करण्यात आला.

आपल्या मनोगतामधे डॉ. निहार वाळिंबे यांनी प्रेरणादायी उदाहरणे व अभ्यासपूर्व मार्गदर्शन केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्रीमती एम. पंगुडवाले यांनी केले. श्री. आर. एम. जगताप यांच्या आभार प्रदर्शनाने कार्यक्रमाची सांगता झाली. ✻✻✻

## विद्याभवन हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय,नेरूळ,नवी मुंबई शाखा

**संचालक : डॉ. शं. पां. किंजवडेकर**
**संचालक : श्री. दिनेश मिसाळ**
**कोषाध्यक्ष : श्री. राजेंद्र बोऱ्हाडे**

**प्राथमिक इंग्रजी विभाग**
**मुख्याध्यापिका सौ. मनिषा मुळिक**

### ६८ वा प्रजासत्ताक दिन

दि. २६ जानेवारी रोजी विद्याभवन शाळेच्या मैदानात ६८ वा प्रजासत्ताक दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. **या कार्यक्रमास प्रमुख अतिथी श्री. सुभाष खाकाळ व विशेष अतिथी श्री. राम खाकाळ यांना आमंत्रित करण्यात आले होते.** संचालक डॉ. शं. पां. किंजवडेकर व श्री. दिनेश मिसाळ, सर्व विभागाच्या मुख्याध्यापिका, शिक्षक, विद्यार्थी व पालक उपस्थित होते. कार्यक्रमाच्या सुरुवातीस प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. यानंतर सर्वांनी राष्ट्रगीत, झेंडागीत म्हटले व ध्वजप्रतिज्ञाही घेण्यात आली. मुख्याध्यापिका सौ. मनिषा मुळीक यांनी प्रमुख पाहुण्यांचा परिचय करून दिला. डॉ. शं. पां. किंजवडेकर यांनी शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन त्यांचे स्वागत केले. विद्यार्थ्यांनी भाषणातून प्रजासत्ताक दिनाची माहिती दिली. पूर्व प्राथमिक इंग्रजी विभागातील विद्यार्थ्यांनी देशभक्तीपर गीतातून देशाचे गुणगान केले. प्राथमिक इंग्रजी विभागाने पिरॅमिडस् सादर केले. प्राथमिक मराठी विभागाने स्काउट ॲण्ड गाईड वर आधारित नृत्य केले. प्रमुख अतिथी श्री. सुभाष खाकाळ यांनी विद्यार्थ्यांना त्यांचा थोडक्यात परिचय दिला. तसेच स्वच्छतेविषयी विद्यार्थ्यांनी जागरुक रहावे हे सांगितले. आपण बऱ्याच वेळेस चॉकलेट, बिस्किटचे कागद तसेच रस्त्यावर फेकून देतो ते रस्त्यावर न टाकता आपल्या खिशात ठेवून जेथे कचरापेटी असेल त्यातच टाकावेत अशी त्यांनी विद्यार्थ्यांना सूचना केली. संचालक डॉ. शं. पां. किंजवडेकर यांनी आपल्या भाषणातून २६ जानेवारी १९३० रोजी लाहोर अधिवेशनात तिरंगा फडकावून पूर्ण स्वराज्याची घोषणा केली होती, म्हणून २६ जानेवारी हा दिवस राज्यघटना अंमलात आणण्यासाठी निवडण्यात आला हे सांगितले, व घटनेच्या महत्वाच्या तत्वांचे स्पष्टीकरण केले. या दिनाचे औचित्य साधून आदर्श शिक्षकांना गौरविण्यात आले. **यावर्षी प्राथमिक इंग्रजी विभागातून मुख्याध्यापिका सौ. मनिषा मुळीक तर माध्यमिक मराठी व ज्यू. कॉलेजच्या मुख्याध्यापिका सौ. विजया गणेश यांना (श्री कमलेश्वर न्यास पुरस्कृत) आदर्श शिक्षिका पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.**


सौ. मनिषा मुळीक


सौ. विजया गणेश

**श्री कमलेश्वर न्यास पुरस्कृत आदर्श विद्यार्थिनी म्हणून कु. मानसी राजेंद्र शिर्के (प्राथमिक इंग्रजी), कु. श्राव्या भास्कर शेट्टी (माध्यमिक इंग्रजी), कु.अनुष्का गणेश महाकाळ (प्राथमिक मराठी), कु. हर्षाली दिलीप पाटील (माध्यमिक मराठी) व कुमार ओंकार शशिकांत भोसले (ज्यू. कॉलेज) या विद्यार्थ्यांना गौरवण्यात आले.** कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सहशिक्षिका सौ. ममता राक्षे यांनी केले व आभार प्रदर्शन सौ. प्रतिभा कुमकर यांनी केले. वंदेमातरम्ने कार्यक्रमाची सांगता झाली.

**अभिनंदनीय वार्ता**

दि. २३.१२.२०१६ रोजी घाटकोपर येथे घेण्यात आलेल्या पुणे विद्यार्थी गृह माजी विद्यार्थी मंडळ मुंबई विभाग आयोजित मारुती लक्ष्मण मराठे स्मृति आंतरशालेय बुध्दिबळ स्पर्धेत **प्राथमिक इंग्रजी विभागाची विद्यार्थिनी कु. भूमिका राजेश नवले (इ. ४थी) हिने तृतीय क्रमांक संपादन केला.** तिला बक्षिस स्वरुपात प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह देऊन तिचा गौरव करण्यात आला.

**नेताजी सुभाषचंद्र बोस जयंती**

दि. २३ जानेवारी २०१७ रोजी विद्याभवन नेरुळच्या सभागृहात नेताजी सुभाषचंद्र बोस यांची जयंती साजरी करण्यात आली. कार्यक्रमासाठी मुख्याध्यापिका सौ. मनिषा मुळीक व माध्यमिक इंग्रजीच्या ज्येष्ठ शिक्षिका सौ. श्रीजा नायर, शिक्षक आणि विद्यार्थी उपस्थित होते. नेताजींच्या प्रतिमेचे पूजन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. सह. शिक्षिका सौ. सुरबिला गोपालकृष्ण व शिक्षक श्री. जगन्नाथ कोळी यांनी नेताजींच्या जीवनातील महत्वाच्या घडामोडी आपल्या भाषणातून मांडल्या. त्यांनी देशाच्या स्वातंत्र्यासाठी केलेल्या उल्लेखनीय कामगिरीचा आढावा घेतला. विद्यार्थ्यांनी भाषणातून नेताजी विषयी माहिती सांगितली. सूत्रसंचालन सौ. प्रिया तिय्यर यांनी केले व सौ. प्रतिभा कुमकर यांनी आभार मानले.

**माध्यमिक इंग्रजी**
**मुख्याध्यापिका सौ. साधना कुलश्रेष्ठ**

**वसंत पंचमी सरस्वती पूजन**

दि. १.२.२०१७ रोजी वसंत पंचमी मोठ्या उत्साहात साजरी झाली. मुख्याध्यापिका सौ. साधना कुलश्रेष्ठ यांनी विद्येची देवता सरस्वती माता यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करुन कार्यक्रमाचा शुभारंभ केला व विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या. इयत्ता ५ वी ब व इ. ८वी च्या विद्यार्थिनींनी 'ये सरस्वती माँ शारदे' या प्रार्थना गीताने वातावरण प्रसन्न केले. तसेच सह. शिक्षिका श्रीमती रत्ना सिंग यांनी वसंत पंचमी दिनाचे औचित्य साधून वसंत म्हणजे ऋतू परिवर्तन, माघ महिन्याची पंचमी तिथी या दिवशी वसंत पंचमी साजरी केली जाते. या दिवसाचे महत्व विद्यार्थ्यांना पटवून दिले. कार्यक्रमास शिक्षक वृंद आणि विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सह. शिक्षक सुहास राऊळ यांनी केले. आभार प्रदर्शन जगन्नाथ कोळी यांनी केले. धवल वस्त्र नेसणारी, मयूर आसनावर बसणारी, विद्येची देवता, बुद्धीची देवता, सरस्वती माता अशा काव्य पंक्तीने कार्यक्रमाची सांगता झाली.

**अभिनंदन वार्ता**

नवी मुंबई पोलीस आयुक्त व महाराष्ट्र राज्य रस्ता सुरक्षा अभियान अंतर्गत डिसेंबर २०१६ मध्ये आंतरशालेय चित्रकला स्पर्धा घेण्यात आली. या स्पर्धेत नवी मुंबईतील शाळांनी सहभाग नोंदवला. यामध्ये संपूर्ण नवी मुंबई विभागातून **कु. तन्वी घरत (इ. ८वी) हिने तृतीय क्रमांक पटकवला.**

**प्राथमिक मराठी विभाग**
**मुख्याध्यापिका सौ. सुवर्णा मिसाळ**

**कनक प्रतिष्ठान शिष्यवृत्ती सराव परीक्षा**

मुंबईतील कनक प्रतिष्ठान तर्फे घेण्यात आलेल्या शिष्यवृत्ती सराव परीक्षेत विद्याभवन प्राथमिक मराठी विभागाच्या खालील विद्यार्थिनींनी नवी मुंबईमधून अनुक्रमे प्रथम व द्वितीय क्रमांक मिळविला.

| विद्यार्थिनीचे नाव | क्रमांक |
|---|---|
| कु. श्रेया दिनेश साळुंके | प्रथम |
| कु. श्रृती संदिप वाघुले | द्वितीय |


H$. I¶m gm i H$


H$. IVr dmKb

**अभिनंदनीय**

दि. ७ फेब्रुवारी २०१७ रोजी घेण्यात आलेल्या नवी मुंबई महानगरपालिका शिक्षण विभाग आयोजित विज्ञान प्रदर्शन २०१६-१७ या स्पर्धेमध्ये विद्याभवन प्राथमिक मराठी विभागाने **प्राथमिक गटातून (इ. १ली ते ५ वी) सादर केलेल्या रंजक विज्ञान या प्रकल्पास प्रथम क्रमांकाचे पारितोषिक प्राप्त झाले. यामधील सहभागी विद्यार्थी कु. यश घाडगे, कु. आदित्य नरवडे, कु. वेदांगी पोखरकर यांना सहशिक्षिका सौ. कविता विनय तेंडुलकर यांनी मार्गदर्शन केले.**

**सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे व त्यांच्या मार्गदर्शक शिक्षकांचे शाळेच्या व संस्थेच्या वतीने हार्दिक अभिनंदन!** ✻✻✻

# डॉ. काकासाहेब देवधर इंग्लिश स्कूल,म्हसरूळ–नाशिक

**संचालक : श्री. संजय गुंजाळ**
**मुख्याध्यापिका : सौ. मनिषा साठे**

**पूर्वप्राथमिक विभाग**

पंडीत जवाहरलाल नेहरू यांच्या जन्मदिनानिमित्त दि. १ नोव्हेंबर २०१६ रोजी पूर्व-प्राथमिक विभागात बालदिन साजरा करण्यात आला. विद्यार्थ्यांनी नेहरूंविषयी माहिती सांगितली. तसेच या दिवशी बालगीते व नृत्यही सादर करण्यात आले.

दि. २८ नोव्हेंबर २०१६ रोजी व दि. ६.१.२०१७ रोजी सि. केजी. च्या तिन्ही वर्गात बीजारोपण कसे करावे हा उपक्रम शिकवण्यात आला. विद्यार्थ्यांनी वेगवेगळ्या धान्यांचे बीजारोपण करून त्यांचे निरीक्षण केले. हा उपक्रम सतत सात दिवस चालणार आहे. शिक्षकांनी विद्यार्थ्यांना 'झाडे लावा, झाडे जगवा' याचे महत्त्व सांगितले.

दि. ९ डिसेंबर २०१६ रोजी नर्सरी इयत्तेच्या दोन्ही वर्गात (Making clay objects) चिकण मातीपासून विविध वस्तु तयार करणे जसे मणी, फळे, खेळणी हा उपक्रम घेण्यात आला.

दि. २० डिसेंबर २०१६ रोजी नाताळ ख्रिसमस डे साजरा करण्यात आला. सर्व विद्यार्थ्यांनी सह-वर्ग सर्वांच्या सुखाची प्रार्थना केली व सांताक्लॉजकडून आशीर्वाद मिळविले.

दि. २४ डिसेंबर २०१६ रोजी पु. वि. गृ संचालित डॉ. काकासाहेब देवधर इंग्लिश स्कूलच्या पूर्व-प्राथमिक व प्राथमिक विभागात वार्षिक स्नेहसंमेलन आणि पारितोषिक वितरण सोहळा उत्साहात संपन्न झाला. यावेळी विद्यार्थ्यांनी विविध गुणदर्शनातून आपापल्या कलागुणांचा प्रत्यय दिला.

भाभानगर येथील कर्मवीर दादासाहेब गायकवाड सभागृहात झालेल्या या कार्यक्रमास **प्रमुख पाहुणे**

**म्हणून शिक्षण मंडळाचे प्रशासनाधिकारी श्री. नितीन उपासनी उपस्थित होते.** संचालक डॉ. निहार वाळिंबे, श्री. अमोल जोशी व श्री. संजय गुंजाळ, मुख्याध्यापिका सौ. मनिषा साठे इत्यादी व्यासपीठावर उपस्थित होते. संचालक श्री. संजय गुंजाळ यांनी प्रमुख पाहुण्यांचे स्वागत केले. संस्थेच्या सेवाभावी कार्याचे श्री. उपासनी यांनी कौतुक केले. त्याचबरोबर विद्यार्थ्यांची चिकाटी व कौशल्याचेही त्यांनी भरभरून कौतुक केले. शिक्षणातूनच व्यक्ती आपली ओळख निर्माण करते असेही ते म्हणाले. यावेळी पूर्व-प्राथमिक विभागाच्या विद्यार्थ्यांनी 'डिस्ने वर्ल्ड' या आशयावर आधारीत विविध नृत्यप्रकार सादर केले. प्राथमिक विभागातील विद्यार्थ्यांनी 'जंगल सफारी' या आशयावर विविध नृत्य सादर केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन इ. ४ थी ते ७वी च्या विद्यार्थ्यांनी केले. साहिल पवार इ. ७वी अ याने आभार प्रदर्शन केले. शिक्षक प्रतिनिधी सौ. प्रतिमा वैद्य यांचे विद्यार्थ्यांना मार्गदर्शन लाभले.

दि. ९ जानेवारी २०१७ पासून पूर्व प्राथमिक विभागात क्रीडा सप्ताह घेण्यात आला. ९ जानेवारी ते ११ जानेवारी दरम्यान वेगवेगळ्या स्पर्धा रनिंग रेस, चमचा-लिंबू, हॉपिंग रेस इत्यादी अशा विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. विद्यार्थ्यांना क्रीडा व व्यायामाचे जीवनात असलेले महत्त्वही पटवून दिले. विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला व प्रत्येक रेस चिकाटीने जिंकण्याचा प्रयत्न केला.

दि. १३ जानेवारी २०१७ रोजी लड्डू डे व सुकामेवा दिन साजरा करण्यात आला. विद्यार्थ्यांनी सुक्यामेव्याचे लाडू व सुका मेवा आणि त्यापासून बनविलेले विविध प्रकार डब्यात आणले होते. सौ. मनिषा साठे यांनी विद्यार्थ्यांना सुका-मेवा यांचे सेवन व त्यामधील पौष्टिक घटक यावर माहिती सांगितली. थंडीत सुका मेवा व त्यापासून बनविलेल्या पदार्थाने आपल्या शरीराला उर्जा मिळते व शरीर उष्ण राहण्यास मदत होते. सर्व पदार्थ एकमेकांना वाटून हा उपक्रम साजरा झाला.

**प्राथमिक विभाग**

दि. ३ नोव्हेंबर २०१६ रोजी शाळेत जागतिक अपंग दिन साजरा करण्यात आला. मुख्याध्यापिका सौ. मनिषा साठे यावेळी उपस्थित होत्या. शिक्षिका सौ. वैशाली राठी यांनी विद्यार्थ्यांना अपंग दिनाविषयी माहिती दिली.

दि. ६ डिसेंबर २०१६ रोजी शाळेत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची पुण्यतिथी साजरी करण्यात आली. मुख्याध्यापिका सौ. मनिषा साठे यांनी त्यांच्या प्रतिमेचे पूजन केले. शिक्षिका सौ. पूर्वा दाणेज यांनी विद्यार्थ्यांना त्यांच्या कार्याविषयी माहिती दिली.

दि. १० डिसेंबर २०१६ रोजी शाळेत मानवी हक्क दिन साजरा करण्यात आला. यावेळी शिक्षिका कु. निलम बिरार यांनी मानवी हक्काविषयी माहिती विद्यार्थ्यांना दिली. तसेच या दिवशी महिन्द्रा ॲण्ड महिन्द्रा कंपनीत AWIM NASHIK OLYMPICS २०१६ ही स्पर्धा आयोजित करण्यात आली. या स्पर्धेत इ. ५ वीच्या विद्यार्थ्यांना बक्षिसे व मेडल्स मिळाली. तसेच इ. ६वी च्या विद्यार्थ्यांना 'Skimmer' साठी सहभागी झाल्याचे सर्टिफिकेट मिळाले.

विद्यार्थ्यांना सौ. सायली पाटील व सौ. निशिगंधा सोमवंशी यांचे मार्गदर्शन लाभले. मुख्याध्यापिका सौ. मनिषा साठे यांनी त्यांचे अभिनंदन केले. स्पर्धेतील सहभागी विद्यार्थी - चि. समर्थ बिडकर, कु. मानसी अहिरे, कु. अभिश्री कुलकर्णी व कु. सृष्टी निरगुडे.

**वार्षिक स्नेहसंमेलन**

दि. २४ डिसेंबर २०१६ रोजी पुणे विद्यार्थी गृहाचे डॉ. काकासाहेब देवधर इंग्लिश स्कूलचे पूर्व प्राथमिक व प्राथमिक विभागाचे वार्षिक स्नेहसंमेलन व बक्षिस समारंभ, दादासाहेब गायकवाड सभागृह येथे उत्साहात पार पडले.

**स्नेहसंमेलनाला प्रमुख अतिथी म्हणून नाशिक महानगरपालिका शिक्षण अधिकारी श्री. नितिन उपासनी उपस्थित होते.** त्यांनी स्नेहसंमेलनात सहभागी विद्यार्थ्यांचे कौतुक केले. तसेच

पालकांनी आपल्या पाल्यांमध्ये सकारात्मकता रुजवावी, त्यांच्या शंकांचे निरसन करावे आणि त्यांना वेळोवेळी मार्गदर्शन करावे असे आपल्या भाषणात सांगितले. तसेच मुख्याध्यापिका, सर्व शिक्षक आणि संस्थेचेही कौतुक केले.

यावेळी कार्याध्यक्ष श्री. एस. एम. जिर्गे, ज्येष्ठ संचालक प्राचार्य हणमंत भोसले, संचालक डॉ. निहार वाळिंबे, श्री. अमोल जोशी, श्री. दिनेश मिसाळ, श्री. संजय गुंजाळ व श्री. कृष्णाजी कुलकर्णी, तसेच मुख्याध्यापिका सौ. सोनिया राजवाडे उपस्थित होत्या. कार्यक्रमाची सुरुवात सरस्वतीपूजन, स्वागतगीत आणि दिप प्रज्वलनाने झाली. मुख्याध्यापिका सौ. मनिषा साठे यांनी प्रमुख पाहुणे तसेच संचालक मंडळाचा सत्कार केला. पालकशिक्षक संघाच्या मंडळाचा सत्कार विद्यार्थी प्रतिनिधींनी केला.

इ. ५ वी व इ. ७वी च्या विद्यार्थ्यांनी OZ-The Great हा musical drama तसेच त्यावर आधारीत नृत्य सादर केले. प्रमुख पाहुणे श्री. नितिन उपासनी यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना बक्षिसे देण्यात आली.

स्नेहसंमेलन यशस्वीरित्या पार पाडण्यासाठी संचालक डॉ. निहार वाळिंबे व श्री. संजय गुंजाळ, मुख्याध्यापिका सौ. मनिषा साठे यांचे बहुमोल मार्गदर्शन लाभले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन इ. ५ वी ते इ. ७वी च्या विद्यार्थ्यांनी केले. शिक्षिका सौ. प्रतिमा वैद्य यांचेही मार्गदर्शन लाभले.

दि. ३ जानेवारी २०१७ रोजी सावित्रीबाई फुले यांची पुण्यतिथी साजरी करण्यात आली. यावेळी शाळेच्या मुख्याध्यापिका सौ. मनिषा साठे उपस्थित होत्या. शिक्षिका सौ. उज्ज्वला गांगुर्डे यांनी त्यांच्या कार्याविषयी विद्यार्थ्यांना माहिती दिली. याच दिवशी बालिका दिन साजरा करण्यात आला. तसेच पतंग उडविताना नायलॉन मांजा वापरू नये. त्याचप्रमाणे त्यामुळे होणारी हानी व पक्षांना होणारा त्रास याविषयीची प्रतिज्ञा घेण्यात आली.

पेन्टोफनतर्फे घेण्यात आलेल्या चित्रकला स्पर्धेत खालील विद्यार्थ्यांना बक्षिसे मिळाली.

चि. आयुष कडाळी - कंपास बॉक्स, कु. अनुक्षा जंगम - कंपास बॉक्स, चि. यश अहिरराव - कंपास बॉक्स, कु. पूर्वा सोनवणे - पाउच, कु. साक्षी भोय - पाउच, कु. जान्हवी भुसारे - पाउच

दि. ८ जानेवारी २०१७ रोजी मराठा विद्याप्रसारक मॅरेथॉन स्पर्धेत इ. ६वी व ७वी च्या विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.

दि. ११ जानेवारी २०१७ रोजी लाल बहादुरशास्त्री यांची पुण्यतिथी साजरी करण्यात आली. हेडबॉय मा. प्रतिक वाघ याने त्यांच्या प्रतिमेला हार घातला व पूजन केले. शिक्षिका सौ. युक्ता बंदे यांनी त्यांच्या कार्याविषयी विद्यार्थ्यांना माहिती दिली.

दि. १२ जानेवारी २०१७ रोजी स्वामी विवेकानंद जयंती साजरी करण्यात आली. हेडगर्ल कु. वैभवी कुलकर्णी हिने त्यांच्या प्रतिमेचे पूजन केले. शिक्षिका सौ. रत्ना गोसावी यांनी त्यांच्या कार्याविषयी विद्यार्थ्यांना माहिती दिली. जिजामाता यांची जयंती याच दिवशी साजरी करण्यात आली. शिक्षिका सविता सावरे यांनी त्यांच्या कार्याविषयी विद्यार्थ्यांना माहिती दिली.

दि. १६ जानेवारी २०१७ रोजी मकर संक्रांत हा सण साजरा करण्यात आला. शिक्षिका सौ. कल्पना जगताप यांनी विद्यार्थ्यांना मकर संक्रांत या सणाविषयी माहिती दिली. तसेच भौगोलिक दिन ही उत्साहात साजरा करण्यात आला. शिक्षिका सौ. राधिका जाधव यांनी या दिनाविषयी मुलांना माहिती दिली.

दि. २२ जानेवारी २०१७ रोजी रेयॉन इंटरनॅशनल स्कूल व रेयान क्लब तर्फे झालेल्या मिनी मॅरेथॉन स्पर्धेत शाळेच्या विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.

दि. २३ जानेवारी २०१७ रोजी नेताजी सुभाषचंद्र बोस यांची जयंती साजरी करण्यात आली. यावेळी त्यांच्या प्रतिमेचे पूजन केले. मुख्याध्यापिका सौ. मनिषा साठे व शिक्षक उपस्थित होते. शिक्षिका कु. स्वाती जाधव यांनी त्यांची माहिती विद्यार्थ्यांना दिली. ❊❊

# कै. माधवराव बळवंत उर्फ काकासाहेब देशमुख विद्यालय, पंचवटी, नाशिक

**संचालक : श्री. अमोल म. जोशी** **मुख्याध्यापक : श्री. ज्ञानेश्वर निंबेकर**

### सावित्रीबाई फुले जयंती

दि. ३ जानेवारी २०१७ रोजी सावित्रीबाई फुले जयंती विद्यालयात साजरी करण्यात आली. मुख्याध्यापक श्री. ज्ञानेश्वर निंबेकर यांचे शुभहस्ते सावित्रीबाई फुले यांचे प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून त्यांचे पूजन करण्यात आले. मुख्याध्यापकांनी सर्वांना शिक्षणाचे महत्त्व सांगून सावित्रीबाई फुले यांचे अनुकरण करण्यास सांगितले. उपशिक्षिका सौ. अस्मिता बावधनकर यांनी सावित्रीबाईंच्या जीवनातील महत्त्वाच्या घटना कथन केल्या. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आणि प्रास्ताविक सौ. तेजश्री जोशी यांनी केले.

### स्वामी विवेकानंद आणि राजमाता जिजाऊ जयंती

दि. १२ जानेवारी २०१७ रोजी स्वामी विवेकानंद आणि राजमाता जिजाऊ जयंती साजरी करण्यात आली. या कार्यक्रम प्रसंगी प्रमुख पाहुणे पोलिस निरिक्षक कुमार चौधरी, कॉन्स्टेबल श्री. आवटी, श्री. राजोळे, श्री. निकम उपस्थित होते. सर्व मान्यवरांच्या शुभहस्ते प्रतिमापूजन संपन्न झाले. श्रीमती सुनंदा ठाकरे यांनी स्वामी विवेकानंद यांच्या जीवनातील महत्त्वाच्या घटना कथन केल्या. उपशिक्षक श्री. तुकाराम मंडले यांनी राजमाता जिजाऊ यांच्यासारखे निष्ठावान, ध्येयवादी व्हावे असा संदेश दिला. मुख्याध्यापक श्री. ज्ञानेश्वर निंबेकर यांनीही स्वामी विवेकानंद आणि राजमाता जिजाऊ यांचे प्रेरणादायी कार्य स्पष्ट केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सौ. तेजश्री जोशी यांनी केले.

### वार्षिक पारितोषिक वितरण समारंभ

दि. २२ जानेवारी २०१७ रोजी विद्यालयाच्या प्रांगणात वार्षिक पारितोषिक वितरण समारंभ संपन्न झाला. या पारितोषिक वितरण समारंभ प्रसंगी **प्रमुख अतिथी पुणे विद्यार्थी गृहाचे कार्यवाह श्री. राजेंद्र कांबळे, श्री. राजेंद्र सोपान सस्ते श्री छत्रपति शाहू महाराज मंदिर विद्यालय, पुणे विभाग प्रमुख, श्री अनिल ग्यानबा जाधव, सिव्हिल इंजिनिअर, संस्थेचे माजी विद्यार्थी, देणगीदार आदी उपस्थित होते.** कार्यक्रमाची सुरुवात प्रमुख अतिर्थींच्या हस्ते सरस्वती पूजन करून झाली. मुख्याध्यापक श्री. ज्ञानेश्वर निंबेकर यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. संचालक श्री. अमोल जोशी यांनी प्रमुख अतिर्थींचा परिचय करून दिला. मुख्याध्यापक श्री. ज्ञानेश्वर निंबेकर यांचे शुभहस्ते शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन प्रमुख अतिर्थींचा सत्कार करण्यात आला. उपशिक्षक श्री. शिवाजी माळी यांनी अहवाल वाचन केले. प्रमुख अतिर्थींच्या शुभहस्ते बक्षिसपात्र विद्यार्थ्यांचा गौरव करण्यात आला. प्रमुख अतिथी श्री. राजेंद्र सोपान सस्ते यांनी यशस्वी विद्यार्थ्यांचा आपल्या मनोगतातून गौरव केला. कार्यक्रमाचे अध्यक्ष श्री. राजेंद्र कांबळे, कार्यवाह, पुणे विद्यार्थी गृह यांनीही बक्षिसपात्र विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सौ. तेजश्री जोशी यांनी केले. आभार प्रदर्शन श्री. शिवाजी माळी यांनी केले.

### नेताजी सुभाषचंद्र बोस जयंती

दि. २३ जानेवारी २०१७ रोजी विद्यालयात नेताजी सुभाषचंद्र बोस जयंती साजरी करण्यात आली. या कार्यक्रमासाठी मुख्याध्यापक श्री. ज्ञानेश्वर निंबेकर सर्व शिक्षकवृंद आणि विद्यार्थी उपस्थित होते. सर्व शिक्षकवृंदानी नेताजींच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून प्रतिमापूजन केले. मुख्याध्यापक श्री. ज्ञानेश्वर निंबेकर यांनी नेताजींचा जीवनपट संक्षिप्त स्वरूपात

विद्यार्थ्यांसमोर सादर केला. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सौ. तेजश्री जोशी यांनी केले. श्री. शिवाजी माळी यांनी आभार मानले.

## प्रजासत्ताक दिन उत्साहात साजरा

भारताचा ६८वा प्रजासत्ताक दिन विद्यालयात उत्साहाने साजरा झाला. या प्रसंगी पुणे विद्यार्थी गृहाच्या अभियांत्रिकी महाविद्यालयाचे प्राचार्य व संचालक डॉ. निहार वाळिंबे, सौ. ऋजुता वाळिंबे, संचालक श्री. संजय गुंजाळ व श्री. अमोल जोशी, मुख्याध्यापक, सर्व शिक्षकवृंद, संस्था कर्मचारी आणि विद्यार्थी उपस्थित होते.

सौ. ऋजुता वाळिंबे यांचे हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. मुख्याध्यापक श्री. ज्ञानेश्वर निंबेकर यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक आणि अतिथींचे स्वागत केले. संचालक श्री. संजय गुंजाळ यांचे शुभहस्ते ‘छान.....छान.....घोषवाक्ये’ या हस्तलिखित अंकाचे प्रकाशन करण्यात आले. ज्येष्ठ शिक्षक श्री. शिवाजी माळी यांनी इ. १०वी च्या विद्यार्थ्यांना गैरमार्गाशी लढा-कॉपीमुक्त अभियान ही प्रतिज्ञा दिली. सौ. ऋजुता वाळिंबे यांनी आदर्श विद्यार्थी दिनचर्या सांगितली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सौ. तेजश्री जोशी यांनी केले. शिक्षक प्रतिनिधी श्री. शिवाजी माळी यांनी आभार मानले.

## महात्मा गांधी पुण्यतिथी

विद्यालयात दि. ३०.१.२०१७ रोजी महात्मा गांधी पुण्यतिथी संपन्न झाली. या प्रसंगी मुख्याध्यापक श्री. ज्ञानेश्वर निंबेकर, शिक्षकवृंद आणि विद्यार्थी उपस्थित होते. मुख्याध्यापक श्री. ज्ञानेश्वर निंबेकर यांनी प्रतिमापूजन करून महात्मा गांधींना अभिवादन केले. महात्मा गांधीजींच्या जीवनातील विविध प्रसंग कथन केले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सौ. तेजश्री जोशी यांनी केले आणि श्री. शिवाजी माळी यांनी आभार मानले.

## शैक्षणिक सहल

शैक्षणिक वर्ष २०१६-१७ ची शैक्षणिक सहल शाळा आणि संस्था यांचे संयुक्त विद्यमाने घृष्णेश्वर, दौलताबाद, खुलताबाद, भद्रामारूती, औरंगाबाद, पैठण येथे आयोजित करण्यात आली होती. या सहलीत शिक्षकवृंद, संस्था कर्मचारी आणि एकूण १०० विद्यार्थी सहभागी झाले. मौजमस्ती करत, शिक्षण घेत, शिस्तीने सर्वांनी सहलीचा आनंद घेतला.

## तीळगुळ समारंभ

दि. २.१.२०१७ रोजी विद्यालयात तीळगुळ समारंभ संपन्न झाला. या कार्यक्रम प्रसंगी प्रमुख अतिथी सौ. ऋजुता वाळिंबे, डॉ. श्री. एकनाथ कुलकर्णी, अध्यक्ष, माजी विद्यार्थी मंडळ, नाशिक, श्री. अमोल जोशी, संचालक, पंचवटी नाशिक हे उपस्थित होते आणि मुख्याध्यापक श्री. ज्ञानेश्वर निंबेकर यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक आणि प्रमुख अतिथींचे स्वागत केले.

प्रमुख अतिथी सौ. ऋजुता वाळिंबे यांनी श्री समर्थ रामदास स्वामींचा संक्षिप्त जीवनपट सांगून विद्यार्थ्यांचे उद्बोधन केले. डॉ. श्री. एकनाथ कुलकर्णी यांनी संक्रांत या सणाचे भौगोलिक, सांस्कृतिक महत्त्व सांगितले. प्रमुख अतिथींच्या हस्ते तीळगुळ घ्या गोड गोड बोला असे सांगून तीळगुळ वाटप करण्यात आला. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सौ. तेजश्री जोशी यांनी केले. श्री. शिवाजी माळी यांनी आभार मानले. ***

---

{ZYZ dmVm

* gñWÀ¶m {dkmZ ‘hm{dÚmb¶, nU ¶Wrb gdH$ Ir. e{eamd JmH$i qeJQ ¶mM d{Sb Ir. JmH$i ‘hmXd qeJQ ¶mM {X. 24.2.2017 amOr d¶mÀ¶m 68 ì¶m dfu XrK AmOmamZ X…IX {ZYZ Pmb.

Bída Ë¶mM AmËå¶mg gXJVr Xdm !

* * *

## विद्याभवन हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय, घाटकोपर, मुंबई शाखा

**ज्येष्ठ संचालक : प्राचार्य के. एन. शिरकांडे**
**कोषाध्यक्ष : श्री. राजेंद्र वि. बोऱ्हाडे**
**संचालक : श्री. दिनेश पि. मिसाळ**

**माध्यमिक इंग्रजी**
**मुख्याध्यापिका सौ. उमा गोपालकृष्णन्**

दि. १५ ते ३० नोव्हेंबर २०१६ या कालावधीत विद्याभवन हायस्कूल क्र. २, इयत्ता ५वी च्या विद्यार्थ्यांसाठी श्री अंबिका योग कुटीर, ठाणे या संस्थेने योगवर्गाचे आयोजन सकाळी ७.३० ते ८.३० या वेळेत केले होते. त्या वर्गांत सूर्यनमस्कार, पद्मासन, वज्रासन, अशी अनेक योगासने शिकवली गेली. त्या योगवर्गाचा समारोप कार्यक्रम दि.३० नोव्हेंबर २०१६ रोजी सकाळी ७.३० ते ९.०० या वेळेत संपन्न झाला. योगशिक्षक व शाळेतील सर्व मान्यवरांनी विद्यार्थ्यांना जीवनातील योगाचे महत्व सांगितले.

### प्रश्नमंजुषा स्पर्धा

दि. ७ डिसेंबर २०१६ रोजी इयत्ता ५वी व ६वी च्या विद्यार्थ्यांची प्रश्नमंजूषा स्पर्धा घेण्यात आली. या स्पर्धेत पुढील विद्यार्थी बक्षिसपात्र ठरले.

**विजयी गट** - चि. विराज नितीन सावंत, चि. तृष्णा विलास हडवळे, चि. अमेय अनिल साळुंखे, चि. कार्तिक संजय फदाले

### क्रीडावृत्त

पोलिस उपायुक्त तथा प्राचार्य, वाहतूक प्रशिक्षण संस्था, भायखळा, मुंबई यांनी दि. १९ व २० डिसेंबर २०१६ रोजी उत्तर विभाग RSP संचलन स्पर्धा आयोजित केली होती. या स्पर्धेत विद्याभवन हायस्कूल नं. २ च्या आर. एस. पी. चमुने दुसरा क्रमांक पटकावला. या चमूचे नेतृत्व कु. साईराज व कु. ओम या विद्यार्थ्यांनी केले होते. या ट्रुपची नायगाव येथे होणाऱ्या संचलन स्पर्धेसाठी निवड झाली आहे.

### टेबल टेनिस स्पर्धा

पुणे विद्यार्थी गृह माजी विद्यार्थी मंडळ, मुंबई विभाग आयोजित कुलगुरु दादासाहेब केतकर मेमोरियल आंतरशालेय टेबलटेनिस स्पर्धेत विद्याभवन हायस्कूल नं. २ च्या पुढील विद्यार्थ्यांनी यश प्राप्त केले.

| गट | विजयी | विद्यार्थ्यांचे नाव | इयत्ता |
|---|---|---|---|
| मोठा | मुले | चि. यश राजन पालेकर | ८वी अ |
| | मुली | कु. ईशा दत्तात्रय खोत | ८वी अ |
| | | कु. कृष्णा रविबाबू तायडे | ८वी अ |

### बुद्धीबळ स्पर्धा

पुणे विद्यार्थी गृह माजी विद्यार्थी मंडळ, मुंबई विभाग आयोजित कुलगुरु दादासाहेब केतकर मेमोरियल आंतरशालेय बुद्धीबळ स्पर्धेत पुढील विद्यार्थ्यांनी यश प्राप्त केले.

| गट | क्रमांक | विद्यार्थ्याचे नाव | इयत्ता |
|---|---|---|---|
| लहान | तृतीय | कु. अनुजा जामसुतकर | ७वी अ |
| | द्वितीय | कु. भाविक नाईक | ९वी अ |
| | तृतीय | कु. यशवंत गाढवे | ८वी अ |

### तिळगुळ समारंभ

दि. १४ जानेवारी २०१७ रोजी मराठी वाङ्मय मंडळातर्फे तिळगुळ समारंभ आयोजित करण्यात आला होता. विविध गीते गाऊन मकर संक्रांत सणाचे महत्व विद्यार्थ्यांनी व्यक्त केले. तिळगुळ समारंभाचे औचित्य साधून इयत्ता ५वी ते ७वी व ८वी ते १०वी या दोन गटात एकपात्री अभिनय स्पर्धा घेण्यात आली होती. विद्यार्थ्यांनी स्पर्धेत उत्स्फूर्तपणे भाग घेतला.

### स्केटिंग स्पर्धा

रोलर रिले स्केटिंग ऑफ इंडिया तर्फे चॅम्पियनशीप स्पर्धा दि. २३ ते २५ डिसेंबर २०१६ रोजी आयोजित केली होती. यशस्वी विद्यार्थ्यांची नावे पुढील प्रमाणे :

| विद्यार्थ्याचे नाव | क्रमांक | इयत्ता |
|---|---|---|
| कु. शर्वरी अनिल विचारे | द्वितीय व तृतीय | ५वी ब |
| चि. राजवीर सिंग मख | तृतीय | ६वी क |
| चि. निखील दिनेश कोहार | तृतीय | ६वी ब |

**विद्याभवन नं. २ (इंग्रजी व मराठी माध्यम)**
**मुख्याध्यापिका सौ. उमा गोपालकृष्ण**

### वार्षिक पारितोषिक वितरण समारंभ

दि. २७ जानेवारी २०१७ रोजी इंग्रजी व मराठी माध्यमाचा पारितोषिक वितरण समारंभ प्रशालेच्या प्रांगणात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या प्रमुख अतिथी दी सोमय्या स्कूल च्या प्राचार्या श्रीमती कविता कर्वे - वैद्य या होत्या. समारंभासाठी विशेष अतिथी म्हणून ज्येष्ठ संचालक प्राचार्य हणमंत भोसले उपस्थित होते. संचालक प्राचार्य कृष्णाजी शिरकांडे, कोषाध्यक्ष श्री. राजेंद्र बोऱ्हाडे, संचालक श्री. कृष्णाजी कुलकर्णी व श्री. दिनेश मिसाळ, समन्वयक श्रीमती सरला नरेंद्रन्, माध्यमिक इंग्रजी व मराठी विभागाच्या मुख्याध्यापक, उपमुख्याध्यापक, पर्यवेक्षक व पालक प्रतिनिधी मंचावर उपस्थित होते.

पाहुण्यांना बॅण्डच्या तालासुरात RSP च्या विद्यार्थ्यांनी मानवंदना दिली. पाहुण्यांनी सरस्वती पूजन करुन दिपप्रज्वलन केले. विद्यार्थ्यांनी सुरेल आवाजात ईशस्तवन व स्वागतगीत गाऊन उपस्थितांचे स्वागत केले. समारंभाच्या सूत्रसंचालिका श्रीमती श्रीलता नायर यांनी कार्यक्रमाची थोडक्यात रुपरेषा सांगितली. अतिशय जोशपूर्ण व सुंदर प्रकारे इ.५वी व ६वीच्या तीन विद्यार्थ्यांनी वार्षिक अहवाल सादर केला. पाहुण्यांचे स्वागत व परिचय इंग्रजी विभागाच्या मुख्याध्यापिका श्रीमती उमा गोपालकृष्णन् यांनी केले. त्यानंतर प्रमुख पाहुण्यांनी आपल्या भाषणातून विद्यार्थ्यांचे कौतुक केले व त्यांना प्रोत्साहन दिले. त्यानंतर मान्यवरांच्या शुभहस्ते विद्यार्थ्यांना बक्षिसे देण्यात आली. वंदेमातरम्ने कार्यक्रमाची सांगता झाली.

**विद्याभवन हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय**
**मुख्याध्यापिका सौ. योगिनी राजेंद्र पोतदार**

### वार्षिक चित्रकला स्पर्धा

दि. १० जानेवारी २०१७ रोजी इ.५वी ते १०वी गटातील विद्यार्थ्यांची वार्षिक चित्रकला स्पर्धा घेण्यात आली. यशस्वी विद्यार्थी पुढीलप्रमाणे.

| गट | क्रमांक | विद्यार्थ्यांचे नाव |
|---|---|---|
| इ.५वी-६वी | प्रथम | चि. हर्षद प्रकाश वळकुंडे |
| | द्वितीय | चि. रोहन राजाराम पोवार |
| | तृतीय | कु. गार्गी राजेंद्र केतकर |
| | उत्तेजनार्थ | चि. चैतन्य सचिन शिंदे |
| | | चि. ओमकार सुनिल पवळे |
| | | चि. क्षितिज विनायक मुंडे |
| | | चि. शुभम रविंद्र पाटील |
| | | चि. लोकेश अनिल खोडके |
| इ.७वी-८वी | प्रथम | कु. आज्ञा शिळीमकर |
| | द्वितीय | कु. श्रेया श्रीकृष्ण वेदपाठक |
| | | कु. सिद्धी बाळकृष्ण घोगरे |
| | तृतीय | चि. ओमकार प्र. पोखरकर |
| | | कु. वेदिका उदय रासकर |
| | उत्तेजनार्थ | कु. शीतल राजाराम रेडेकर |
| | | कु. स्वरांगी शैलेंद्र शिरसेकर |
| | | कु. सानिका यशवंत पवार |
| | | कु. आसावरी प्र. वळकुंडे |
| | | कु. दिशा अजय शेटे |
| | | चि. चिन्मय अजित पटाडे |
| इ.९वी-१०वी | प्रथम | चि. गणेश सुधीर चौधरी |
| | द्वितीय | चि. कादंबरी कै. जगताप |
| | | कु. निधी एकनाथ घाडी |
| | तृतीय | चि. भूषण अरविंद पारकर |
| | | चि. हर्षल मंगेश बेंद्रे |
| | उत्तेजनार्थ | कु. शुभांगी पंडित गाडेकर |
| | | कु. कुनिका बाळकृष्ण माने |
| | | कु. प्रथमेश दिलीप खुळे |
| | | कु. सुरेखा महादेव आंबेकर |
| | | चि. सिद्धेश सुनिल दराडे |

### नवोपक्रम शैक्षणिक साहित्य कक्ष उद्घाटन

दि. १३ जानेवारी २०१७ रोजी नव्याने सुरु करण्यात आलेल्या नवोपक्रम शैक्षणिक साहित्य कक्षाचे उद्घाटन कार्याध्यक्ष श्री. सुभाष जिर्गे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी संचालक प्राचार्य के. एन. शिरकांडे, कोषाध्यक्ष श्री. राजेंद्र बोऱ्हाडे,

मुख्याध्यापिका, उपमुख्याध्यापिका, पर्यवेक्षिका, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. या कक्षात शिक्षक व विद्यार्थी निर्मित विषयनिहाय शैक्षणिक साहित्य ठेवण्यात आले आहे. या साहित्याचा अध्ययन-अध्यापनात नियमित वापर केला जातो. त्यामुळे विद्यार्थ्यांची गुणात्मक वाढ होण्यास मदत होते. यापैकी काही साधनांची ओळख व उपयुक्तता शिक्षक प्रतिनिधी म्हणून श्री. अंकुश कारंडे व श्री. रुपेश मांडवेकर यांनी उपस्थितांना सांगितली.

**६८ वा प्रजासत्ताक दिन दि.२६ जानेवारी २०१६**

विद्याभवन प्रशालेच्या प्रांगणात ६८ वा प्रजासत्ताक दिन मोठ्या उत्साहात साजरा झाला. प्रमुख पाहुणे ज्येष्ठ संचालक प्राचार्य हणमंत भोसले यांच्या हस्ते ध्वजारोहण झाले. संचालक श्री. के. एन. शिरकांडे, कोषाध्यक्ष श्री. राजेंद्र बोऱ्हाडे मुख्याध्यापिका, उपमुख्याध्यापिका, पर्यवेक्षक, समन्वयक व इतर मान्यवर मंचावर उपस्थित होते.

विद्यार्थ्यांनी राष्ट्रगीत व ध्वजगीत तालासुरात गाऊन तिरंगी ध्वजाला सलामी दिली. R.S.P. च्या विद्यार्थ्यांनी बॅण्डच्या तालावर पाहुण्यांना मानवंदना दिली. प्रमुख पाहुण्यांचा परिचय व स्वागत श्रीमती योगिनी पोतदार, मुख्याध्यापिका, मराठी माध्यमिक विभाग यांनी केले. इंग्रजी व मराठी माध्यमाच्या मुलांनी सुंदर साधनयुक्त मिश्र कवायत प्रकार केले. त्यानंतर मुलांनी लेझिम प्रात्यक्षिक, योगासने प्रात्यक्षिक इतकेच काय पण अतिशय सुंदर प्रकारे मानवी मनोरे रचले. त्यांच्या या सादरीकरणाने सर्वांना थक्क करुन टाकले. जिम्नॅस्टिक्सचे प्रात्यक्षिक दोन्ही माध्यमाच्या विद्यार्थ्यांनी दाखविले. स्फूर्तिदायक समूहगीते व देशभक्तीपर भाषणांनी वातावरण प्रफुल्लीत झाले.

आर.एस.पी. बेस्ट कॅडेट विद्यार्थ्यांचा सन्मान करण्यात आला. **संस्थेचे ज्येष्ठ माजी विद्यार्थी कै. ज. शां. वैद्य पुरस्कृत आदर्श शिक्षक पुरस्कार विद्याभवन हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालयाच्या उपमुख्याध्यापिका श्रीमती सुरेखा लऊळकर व सहा. शिक्षिका श्रीमती नंदा राजेंद्र पोखरकर यांना तसेच प्राथमिक मराठी माध्यमाच्या मुख्याध्यापिका श्रीमती अल्पना जोशी व प्राथमिक इंग्रजी विभागाच्या सहा. शिक्षिका श्रीमती शोभा हरवंदे यांना श्री. शरद्चंद्र बाळकृष्ण खेर आदर्श शिक्षक पुरस्कार देऊन गौरविण्यात आले.** प्रमुख पाहुण्यांनी आपल्या जोशपूर्ण भाषणात प्रजासत्ताक दिनाचे महत्व विषद केले. वंदे मातरम्ने कार्यक्रमाची सांगता झाली.

**वार्षिक पारितोषिक वितरण समारंभ**

दि. २८ जानेवारी २०१७ रोजी प्रशालेत विद्याभवन हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालयाचा वार्षिक पारितोषिक वितरण समारंभ संपन्न झाला. प्रमुख पाहुणे श्री. अनिल साबळे, शिक्षण निरीक्षक, बृहन्मुंबई उत्तर विभाग यांच्या व इतर मान्यवरांच्या हस्ते सरस्वतीपूजन व दिपप्रज्वलन झाले. विद्यार्थ्यांनी ईशस्तवन व स्वागतगीत सादर केले.

मुख्याध्यापिका सौ. योगिनी पोतदार यांनी प्रमुख पाहुण्यांचा परिचय करुन दिला. कार्याध्यक्ष श्री. सुभाष जिर्गे यांच्या हस्ते शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन प्रमुख पाहुण्यांचा सत्कार करण्यात आला.

इ.८वी ब मधील कु. श्रावणी कारभारी व इ.९वी क मधील कु. कुनिका माने या विद्यार्थीनींनी सन २०१६-१७ चा अहवाल संवादरुपाने सादर केला. विशेष अतिथी प्राचार्य हणमंत भोसले यांनी लोकमान्य टिळक, अब्दुल कलाम यांच्या कथांद्वारे विद्यार्थ्यांनी आपले व्यक्तिमत्व घडवावे व विज्ञानाची कास धरावी असे मार्गदर्शन केले.

सर्व यशस्वी विद्यार्थ्यांना पाहुण्यांच्या हस्ते प्रमाणपत्रे व बक्षिसे देऊन गौरविण्यात आले. प्रमुख पाहुणे श्री. अनिल साबळे यांनी आपल्या मार्गदर्शनपर भाषणांत सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे कौतुक केले. विद्यार्थ्यांमधील सुप्तगुण बाहेर येण्यासाठी विविध स्पर्धा व व्यासपीठ आवश्यक असल्याचे सांगितले. विद्याभवन प्रशालेचे कौतुक करुन विद्यार्थी या नामांकित शाळेत शिक्षण घेत असल्याबद्दल आनंद व्यक्त केला.

विवेकानंदांची शिक्षण विषयक व्याख्या सांगून विद्यार्थ्यांनी वैज्ञानिक दृष्टीकोन जोपासावा असे सांगितले. तसेच तरुणांनी पालक, समाज व देशाच्या ऋणांची जाणीव ठेवून विज्ञान व तंत्रज्ञानाचा उपयोग देश उभारणीसाठी करावा असे सांगितले. ज्ञानरचना वादाबाबत मार्गदर्शन करताना शिक्षकांनी विद्यार्थ्यां मधील सुप्त क्षमता ओळखून काम करावे असे सांगितले. विजेत्यांबरोबरच सर्व स्पर्धा व सहशालेय उपक्रमांमधील सहभागी विद्यार्थ्यांचेही अभिनंदन केले. तसेच पालकांनी पाल्यांसाठी आपला अमूल्य वेळ द्यावा असे आवाहन केले.

कार्यक्रमासाठी संस्थेचे सर्व मान्यवर पदाधिकारी, मुख्याध्यापक, उपमुख्याध्यापिका, पर्यवेक्षक, पालक-शिक्षक संघटनेचे सर्व सदस्य, पालक, शिक्षक व विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमाची सांगता वंदेमातरम्‌ने झाली.

**निरोप समारंभ : इंग्रजी व मराठी माध्यम**

दि. ३१ जानेवारी २०१७ रोजी इ. १०वी चा निरोप आयोजित करण्यात आला. **संस्थेचे हितचिंतक श्री. बाबासाहेब वाघमारे, मुख्य ग्रंथपाल, विधान भवन, महाराष्ट्र राज्य हे प्रमुख पाहुणे होते.**

कोषाध्यक्ष श्री. राजेंद्र बोऱ्हाडे यांच्या हस्ते पाहुण्यांचे श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले. श्री. बाबासाहेब वाघमारे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना मनसोक्त खेळा पण मनसोक्त अभ्यास करा असे सांगितले. तसेच मोबाईलचा अतिरेकी वापर करु नका, ज्ञान संपादनासाठी वापर करा असे सांगितले. पालकांशी संभाषण करा, स्वमग्न राहू नका. चांगल्या मित्रांच्या सहवासात रहा, पालकांची स्वप्ने पूर्ण करा. इ. १०वी व १२ वी परीक्षांचा भरपूर अभ्यास करा. मोठ्या व्यक्तींचे आशीर्वाद घ्या, स्वत:ची क्षमता ओळखा. शाळेची कायम आठवण ठेवा. मन, मनगट व मेंदू या तीन गोष्टींचे स्मरण ठेवा. मेंदूद्वारे मनाला योग्य दिशा देऊन मनगटाद्वारे कृती करा. शब्दांचा योग्य वापर करायला शिका. शाळा, पालक व समाज यांची आठवण ठेवा. ज्या क्षेत्रात जाल तिथे यशस्वी व्हा असे आवाहन केले.

यानंतर अनेक विद्यार्थ्यांनी आपल्या भावना भाषणे व काव्यातून व्यक्त केल्या. शिक्षकांबद्दल, शाळेबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. शिक्षकांनी विद्यार्थ्यांना परीक्षेसाठी शुभेच्छा दिल्या व मार्गदर्शन केले. अनेक विद्यार्थ्यांनी आपल्या भावना भाषणातून व काव्यातून व्यक्त केल्या. या प्रसंगी संचालक प्राचार्य के. एन. शिरकांडे, श्री. राजेंद्र बोऱ्हाडे, सर्व विभागांचे प्रमुख व शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

## प्राथमिक इंग्रजी विभाग
## मुख्याध्यापिका सौ. शुभांगी जाधव

**वार्षिक पारितोषिक वितरण समारंभ**

दि. २७ जानेवारी २०१७ रोजी विद्याभवन प्राथमिक इंग्रजी, या शाळेचा वार्षिक पारितोषिक वितरण समारंभ आयोजित करण्यात आला होता. **या कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी श्री. विनायक कामत, समाज सेवक हे होते.** संस्थेचे मान्यवर पदाधिकारी, मुख्याध्यापिका, उपमुख्याध्यापिका, पर्यवेक्षक या प्रसंगी उपस्थित होते.

दिप प्रज्वलनाने कार्यक्रमाचा शुभारंभ झाला. इयत्ता ३री व ४थी च्या विद्यार्थ्यांनी ईशस्तवन व स्वागत गीत सादर केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री. दिपक निचित यांनी त्यांच्या उत्कृष्ट वक्तृत्व कौशल्याने केले.

इयत्ता ४थी च्या विद्यार्थ्यांनी संवाद रुपात वार्षिक अहवाल सादर केला. इयत्ता ४थी च्या विद्यार्थिनींनी नृत्यकला सादर केली. प्रमुख अतिथी श्री. विनायक कामत यांनी आपल्या मोजक्या शब्दांत शाळेबद्दल असलेले त्यांचे जिव्हाळ्याचे नाते, शाळेच्या प्रगतीविषयी असलेले त्यांचे विचार व्यक्त केले. प्रमुख अतिथी, संचालक, मुख्याध्यापिका व इतर मान्यवरांच्या हस्ते बक्षिसे देण्यात आली. वंदे मातरमने कार्यक्रमाची सांगता झाली.

**पूर्व-प्राथमिक इंग्रजी विभाग**
**मुख्याध्यापिका सौ. शुभांगी जाधव**

**वार्षिक पारितोषिक वितरण समारंभ**

दि. ३० जानेवारी २०१७ रोजी विद्याभवन पूर्व प्राथमिक इंग्रजी विभागाचा वार्षिक पारितोषिक वितरण समारंभ पार पडला. **या समारंभास प्रमुख पाहुणे म्हणून ज्येष्ठ संचालक प्राचार्य हणमंत भोसले, विशेष अतिथी कुलसचिव श्री. सुनिल रेडेकर उपस्थित होते.** कोषाध्यक्ष श्री. राजेंद्र बोऱ्हाडे, संचालक श्री. कृष्णाजी कुलकर्णी व श्री. दिनेश मिसाळ उपस्थित होते.

प्रमुख अतिथींच्या हस्ते दीप-प्रज्वलन व सरस्वती पूजन झाले. छोटा शिशु वर्गाच्या मुलांनी गणेशवंदना नृत्यातून सादर केली. नर्सरीच्या मुलांनी बुगी वुगी हे नृत्य सादर केले. मोठा शिशुच्या मुलांनी विविध सण कसे साजरे केले हे नृत्यातून सादर केले. अशा प्रकारे एक आगळा वेगळा वार्षिक अहवालच सादर केला. प्रमुख पाहुण्यांनी मुलांचे कौतुक केले. मुलांना आपल्या भाषणातून प्रोत्साहित केले. प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते मुलांना बक्षिसे देण्यात आली.

**प्राथमिक मराठी विभाग**
**मुख्याध्यापिका सौ. अल्पना विकास जोशी**

**वार्षिक पारितोषिक वितरण समारंभ**

शनिवार दि. २८.१.२०१७ रोजी विद्याभवन प्राथमिक मराठी विभागाचा वार्षिक पारितोषिक वितरण समारंभ साजरा झाला. **या कार्यक्रमासाठी श्री. भगीरथ विष्णु शानभाग, हेड-एच.आर.ॲण्ड पर्सोनेल, लार्सन ॲण्ड टुब्रो लिमिटेड व त्यांच्या पत्नी सौ. दीपा शानभाग हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.** विशेष अतिथी म्हणून श्री. विजय जाधव, शिक्षण निरीक्षक, बृहन्मुंबई महानगरपालिका तसेच माजी कार्याध्यक्ष प्राचार्य हणमंत भोसले, कोषाध्यक्ष श्री. राजेंद्र बोऱ्हाडे, संचालक प्राचार्य के. एन. शिरकांडे व श्री. दिनेश मिसाळ, मुख्याध्यापिका व शाळा व्यवस्थापन समितीच्या सदस्या सौ. लक्ष्मी मर्गज इ. मान्यवर होते.

प्रमुख पाहुणे, विशेष अतिथी व मान्यवरांच्या हस्ते सरस्वती पूजन व दीप प्रज्वलन करण्यात आले. इ. १ली व २रीच्या विद्यार्थिनींनी सर्वात्मका ईशसुंदरा हे ईशस्तवन सादर केले. त्यानंतर इ. ३री व ४थीच्या विद्यार्थिनींनी स्वागतगीत सादर केले. प्रास्ताविक प्राचार्य हणमंत भोसले यांनी केले. पाहुण्यांचा व विशेष अतिथींचा परीचय मुख्याध्यापिका सौ. अल्पना जोशी यांनी करुन दिला.

शैक्षणिक वर्ष २०१६-२०१७ च्या अहवालाचे सादरीकरण इ. ४थी च्या विद्यार्थ्यांनी खूप सुंदर पद्धतीने केले. कु. ईश्वरी देसाई व चि. ओम बोडके या विद्यार्थ्यांची अहवाल सादर करण्याची पद्धत विशेष अतिथी श्री. विजय जाधंव यांना खूपच भावली. अहवाल सादरीकरणानंतर प्रमुख पाहुणे श्री. भगीरथ शानभाग यांनी आपले मनोगत व्यक्त केले. मातृभाषेतून शिक्षण घेण्यामुळे विद्यार्थ्यांना सखोल ज्ञान होते. ते स्वत:ही मराठी माध्यमातूनच शिकले याचा त्यांनी आवर्जुन उल्लेख केला. विद्यार्थ्यांना पुढील शिक्षणासाठी करीअर मार्गदर्शन करण्याचे त्यांनी आश्वासन दिले. विशेष अतिथी श्री. विजय जाधव यांनी विद्याभवन शाळा आर.टी.ई. अंतर्गत सर्व निकष पूर्ण करते असे गौरवोद्गार काढले. विद्याभवन सारख्या आदर्श शाळेचे आपण एक भाग आहात. खरोखरच तुम्ही भाग्यवान आहात कारण तुम्हाला अशी शाळा मिळाली.

सर्व मान्यवरांच्या हस्ते पारितोषिके देण्यात आली. वंदे मातरम्‌ने कार्यक्रमाची सांगता झाली.

**पूर्व प्राथमिक मराठी विभाग**
**मुख्याध्यापिका सौ. अल्पना विकास जोशी**

**वार्षिक पारितोषिक वितरण समारंभ**

दि. ३० जानेवारी २०१७ रोजी पूर्व प्राथमिक मराठी विभागाचा वार्षिक पारितोषिक वितरण समारंभ शाळेच्या प्रांगणात आयोजित करण्यात आला होता. या समारंभास प्रमुख पाहुणे ज्येष्ठ संचालक प्राचार्य हणमंत

भोसले, विशेष अतिथी म्हणून संचालक प्राचार्य के. एन. शिरकांडे तसेच मान्यवर पदाधिकारी उपस्थित होते.

प्रमुख अतिथींच्या हस्ते दीप-प्रज्वलन व सरस्वती पूजन करण्यात आले. छोटा शिशुच्या मुलांनी गणपती स्तोत्र म्हटले. छोटा व मोठा शिशुच्या मुलांनी स्वागतम हे गीत नृत्यातून सादर केले. तसेच मोठा शिशु वर्गाच्या विद्यार्थ्यांनी अहवाल सादर केला.

प्रमुख पाहुणे श्री. हणमंत भोसले यांनी आमच्या छोटया बाळगोपाळांचे कौतुक केले. तसेच छोट्या मुलांकडून कार्यक्रमाची तयारी करुन घेणाऱ्या शिक्षकांचेही कौतुक केले. अशीच शाळेची उत्तरोत्तर प्रगती होत राहो, अशी सदिच्छा व्यक्त केली. व्यासपीठावरील मान्यवरांच्या हस्ते यशस्वी विद्यार्थ्यांना पारितोषिके देऊन गौरविण्यात आले. ***

## पुणे विद्यार्थी गृह माजी विद्यार्थी मंडळ, मुंबई विभाग

### दि. १९ फेब्रुवारी २०१७ रोजी झालेल्या कार्यकारिणी सभेचे इतिवृत्त.

पुणे विद्यार्थी गृह माजी विद्यार्थी मंडळ मुंबई विभाग कार्यकारिणीची मासिक सभा रविवार दि. १९ फेब्रुवारी २०१७ रोजी दुपारी ४.३० वाजता विद्याभवन, घाटकोपर, मुंबई येथे झाली.

**विषय क्र. १** - दि. ८ जानेवारी २०१७ रोजी झालेल्या कार्यकारी मंडळाच्या सभेचे इतिवृत्त श्री श्रीरंग वैद्य यांनी वाचले. ते मंजूर झाले.

**विषय क्र. २** - वर्ष २०१७ - १८ साठी अंदाजपत्रक श्री म. अ. जोशी यांनी मांडले. त्यात 'दोन तपस्वी' पुस्तक छपाईचे आकडे मिळवून सुधारित अंदाजपत्रक एकमताने मंजूर झाले.

**विषय क्र. ३** - २०१५ - १६ चे जमाखर्च व ताळेबंद पूर्ण करुन त्याचे लेखापरीक्षण करणे. श्री म. अ. जोशी यांनी सांगितले की, येत्या आठवड्यात (दि. २० ते २५ फेब्रुवारी २०१७) मी नेरुळला जाऊन श्री. तेंडुलकरांच्या मदतीने जमाखर्च व ताळेबंद पूर्ण करीन व लगेच ते श्री. गडकरी यांचेकडून तपासूनही घेईन. सभेने यावर समाधान व्यक्त केले.

**विषय क्र. ४** - मार्च २०१७ मधील कार्यक्रम : अध्यक्षांनी सांगितले की, दि. ८ मार्च २०१७ ला जागतिक महिला दिन आहे व तो आपल्याला घाटकोपर व नेरुळ विद्याभवनात साजरा करायचा आहे. महिला पालकांना दि. ८ मार्च रोजी किंवा जवळच्या सोयीच्या दिवशी बोलावून त्यांचे खेळ घ्यावे व बक्षिसे ठरवावी. घाटकोपरला डॉ. चित्रा कामत यांना प्रमुख अतिथी म्हणून बोलावावे. त्या नसल्यास सौ. प्रभावती देशपांडे (घाटकोपर) यांना बोलववावे. नेरुळला सौ. अर्चना लिमये (उत्कर्ष महिला मंडळ) यांना प्रमुख अतिथी म्हणून बोलवावे असे ठरले.

**विषय क्र. ५ - एप्रिलमधील माजी विद्यार्थी महासंमेलन :- श्री दिनेश मिसाळ यांनी सांगितले की, महामंडळातर्फे माजी विद्यार्थी महासम्मेलन शनिवार दि. २२ व रविवार दि. २३ एप्रिल रोजी विद्याभवन, नेरुळ येथे घेण्याचे ठरले आहे.** त्या वेळी माजी विद्यार्थी मंडळातर्फे एक शैक्षणिक परिसंवाद घेतला जातो. त्यावर विचार व्हावा. श्री. श्रीरंग वैद्य यांनी सूचविले की, 'महाराष्ट्र खाजगी शाळा सेवाशर्ती कायदा १९८१ : संबंधितांच्या जबाबदाऱ्या समस्या, व उपाय' या विषयावर परिसंवाद ठेवावा. घाटकोपर, नेरुळ येथील मुख्याध्यापक व शिक्षकांना आमंत्रित करावे. शिक्षणमंत्र्यांच्या खाजगी सचिव सौ. साठे याही परिसंवादात भाग घेऊ शकतील. अध्यक्षांनी सूचविले की, या परिसंवादासाठी अध्यक्ष म्हणून मा. श्री. र. शि. चव्हाण अतिरिक्त आयुक्त, नवी मुंबई महानगरपालिका व वक्ते म्हणून श्री. संदीप सांगवे, शिक्षणाधिकारी, नवी मुंबई महापालिका व नुकतेच निवडून आलेले आमदार श्री बाळाराम पाटील यांनाही आमंत्रित करावे. संस्थेतर्फे प्रा. हणमंत भोसले, श्री. राजेंद्र बोऱ्हाडे बोलतील. सभेने या योजनेला मान्यता दिली.

**विषय क्र. ६** - अध्यक्षांनी विद्याभवनच्या पूर्व मुख्याध्यापिका श्रीमती अनुराधा मेहेंदळे यांच्या यजमानांच्या आकस्मिक निधनाबद्दल व श्रीमती रमा माधव किंजवडेकर व श्रीमती पद्मा केशव किंजवडेकर (अध्यक्षांच्या वहिनी) यांच्या गेल्या महिन्यातील दु:खद निधनाबद्दल दुखवट्याचा ठराव मांडला. सर्वांनी २ मिनिटे शांत उभे राहून मृतांना सद्गति लाभो अशी प्रार्थना केली. ***

## हितचिंतक व आश्रयदाते यांच्या मदतीचे वृत्त, पुणे विभाग

**कोषाध्यक्ष – श्री. राजेंद्र बोऱ्हाडे** **संचालक – श्री. कृष्णाजी कुलकर्णी**

**दि. १.१.२०१७ ते १५.१.२०१७**

**पुढील देणगीदारांनी संस्थेला देणगी देऊन सक्रिय सहाय्य केलेले आहे.**
**संस्थेविषयी असलेल्या आत्मीयतेबद्दल सर्वांचे आभारी आहोत.**

**देणगी रु. १०,००१/- वरील सर्व**

**सौ. राधिका किशोर खांडेकर, पुणे**
**देणगी रु. १,००,०००/-**

सौ. राधिका किशोर खांडेकर यांनी दि. १०.१.२०१७ रोजी रु. १,००,०००/- देणगी सासू कै. विमलताई पांडुरंग खांडेकर यांच्या स्मृतिप्रित्यर्थ दिलेली आहे. सदर देणगीचा विनियोग संस्थेच्या आवारातील एखाद्या वर्गाला, हॉलला नामफलक लावण्यासाठी करण्यात येईल.

**श्री. अशोक लक्ष्मण पेंडसे, पुणे**
**देणगी रु. ७५,०००/-**

श्री. अशोक लक्ष्मण पेंडसे यांनी दि. १३.१.२०१७ रोजी रु. ७५,०००/- देणगी दिलेली आहे. सदर देणगीचा विनियोग संस्थेच्या सुयोग्य कार्यासाठी करण्यात येईल.

**श्री. रामचंद्र गणेश दक्षिणदास, पुणे**
**देणगी रु. ५०,०००/-**


सुहास दक्षिणदास

श्री. रामचंद्र गणेश दक्षिणदास यांनी दि. ८.१.२०१७ रोजी रु. ५०,०००/- ची देणगी पत्नी कै. सौ. सुहास (शीला) रामचंद्र दक्षिणदास यांचे पुण्यस्मरणार्थ दिलेली आहे. सदर देणगीचा विनियोग शैक्षणिक वर्ष २०१७-१८ मध्ये संस्थेच्या आश्रमीय गरीब, गरजु व हुशार अशा पाच विद्यार्थ्यांना शैक्षणिक मदत देण्यासाठी करण्यात येईल.

**श्री. संजीव भास्कर दाते, भोपाळ (मध्य प्रदेश)**
**देणगी रु. २०,०००/-**


भास्कर दाते


सुनंदा भास्कर दाते

श्री. संजीव भास्कर दाते यांनी दि. ९.१.२०१७ रोजी रु. २०,०००/- कै. भास्कर मुरलीधर दाते व कै. सुनंदा भास्कर दाते यांच्या पुण्यस्मरणार्थ प्रत्येकी रु. १०,०००/- दिलेली आहे. सदर देणगी पूर्वीच्या देणगीत समाविष्ट करून येणाऱ्या व्याजाचा विनियोग प्रतिवर्षी आश्रमीय गरीब, गरजु, होतकरू ब्राह्मण विद्यार्थ्यास शिष्यवृत्ती देण्यासाठी करण्यात येईल.

**श्री. अमरेंद्र प्रभाकर गोरे, पुणे**
**देणगी रु. १५,०००/-**

श्री. अमरेंद्र प्रभाकर गोरे यांनी दि. १.१.२०१७ रोजी रु. १५,०००/- ची देणगी दिलेली आहे. देणगी रु. ४,०००/- कै. पंडित मदनमोहन मालवीय (१२ नोव्हेंबर) तसेच देणगी रु. ११,०००/- कै. भार्गव जगन्नाथ दामले (३ ऑगस्ट) यांच्या पुण्यस्मरणार्थ दिलेली आहे. सदर देणगी रु. ४,०००/- व्याजाचा विनियोग अनुक्रमे स्मृतिदिनी महाराष्ट्र विद्यालयामध्ये इ. ९वी संस्कृत विषयात प्रथम येणाऱ्या विद्यार्थ्यास पारितोषिक देण्यासाठी करण्यात येईल. तसेच



पंडित मदनमोहन मालवीय



भार्गव दामले

रु. ११,०००/- च्या व्याजाचा विनियोग संस्थेच्या कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग ॲण्ड टेक्नॉलॉजीच्या वसतीगृहामधील प्रथम वर्ष प्रिंटिंग इंजिनिअरिंगच्या गरीब, गरजु, हुशार विद्यार्थ्यास पारितोषिक देण्यासाठी करण्यात येईल.

**श्री. श्रीकांत पंचपोर रु. २,५००/-, श्री. प्रकाश जी कोझरेकर रु. २,५००/-, श्री. जय जी. बायकेरीकर रु. ५,०००/-, श्री. अतुल विष्णू गांगल रु. २,५००/-, श्री. राजाराम विठ्ठल बंडगर रु. २,५००/- ठाणे, देणगी रु. १५,०००/-**

श्री. श्रीकांत पंचपोर, श्री. प्रकाश जी. कोझरेकर, श्री. जय जी. बायकेरीकर, श्री. अतुल विष्णू गांगल, श्री. राजाराम विठ्ठल बंडगर यांनी मिळून दि. ३.१.२०१७ रोजी रु. १५,०००/- ची देणगी दिलेली आहे. सदर देणगीचा विनियोग संस्थेच्या आश्रम वसतिगृह विद्यार्थ्यांना नवीन चादर व सतरंजी देण्यासाठी करण्यात येईल.

**देणगी रु. ५,००१/- ते रु. १०,०००/-**

**श्री. गिरीष श्रीधर लिमये, पुणे**
**देणगी रु. ७,४००/-**

श्री. गिरीष श्रीधर लिमये यांनी दि. ५.१.२०१७ रोजी रु. ७,४००/- ची देणगी दिलेली आहे. देणगी रु. २,५००/- कै. नीलकंठ विठ्ठल लिमये (कार्तिक शुद्ध ३) व देणगी रु. २,५००/- व कै. सुधाबाई विठ्ठल लिमये (पौष शुद्ध ९) यांचे पुण्यस्मरणार्थ दिलेली आहे. सदर देणगीचा विनियोग स्मृतिदिनी आश्रमीय विद्यार्थ्यांना पिठलं भाकरी ठेचा व शेवईखीर देण्यासाठी करण्यात आला. तसेच रु. २,४००/- चा विनियोग माहे एप्रिल २०१६ ते मार्च २०१७ प्रतिमहाप्रमाणे आश्रमीय विद्यार्थ्यांच्या अन्नखर्चासाठी करण्यात येईल.

**सौ. नलिनी पांडुरंग बुरसे, पुणे**
**देणगी रु. १०,०००/-**

सौ. नलिनी पांडुरंग बुरसे यांनी दि. ६.१.२०१७ रोजी रु. १०,०००/- ची देणगी वडिल कै. जनार्दन माधवराव उर्फ आबासाहेब पोतनीस (पौष शुद्ध ११) व मातोश्री कै. इंदिराबाई पोतनीस (भाद्रपद शुद्ध १४, अनंत चतुर्दशी) यांचे पुण्यस्मरणार्थ दिलेली आहे. सदर देणगी व्याजाचा विनियोग प्रतिवर्षी स्मृतिदिनी आश्रमीय विद्यार्थ्यांच्या अन्नखर्चासाठी करण्यात येईल.

**सौ. नलिनी प्रभाकर दसनुरकर, पुणे**
**देणगी रु. १०,०००/-**

सौ. नलिनी प्रभाकर दसनुरकर यांनी दि. ६.१.२०१६ रोजी रु. १०,०००/- ची सदिच्छा देणगी दिलेली आहे.

**सौ. रुपा सुनील जामखेडकर, पुणे**
**देणगी रु. ५,५००/-**

सौ. रुपा सुनील जामखेडकर यांनी दि. ६.१.२०१७ रोजी रु. ५,५००/- ची देणगी कै. सौ. शीला विश्वनाथ जामखेडकर यांचे पुण्यस्मरणार्थ दिलेली आहे. सदर देणगीचा विनियोग दि. ६.१.२०१७ (शुक्रवार) रोजी सायंकाळी आश्रमीय विद्यार्थ्यांना शिरा मिष्टान्नासह भोजन देण्यासाठी करण्यात आला.

**श्री. भालचंद्र गणेश पटवर्धन, पुणे**
**देणगी रु. १०,०००/-**



सुनिता पटवर्धन

श्री. भालचंद्र गणेश पटवर्धन यांनी दि. ७.१.२०१७ रोजी रु. १०,०००/- ची देणगी कै. सौ. सुनिता भालचंद्र पटवर्धन यांचे पुण्यस्मरणार्थ दिलेली आहे. सदर देणगी पूर्वीच्या देणगीत समाविष्ट

करून येणाऱ्या व्याजाचा विनियोग प्रतिवर्षी स्मृतिदिनी आश्रमीय विद्यार्थ्यांना अन्नखर्चासाठी करण्यात येईल.

**सौ. सुप्रिया सुहास पोतनीस, पुणे**

**देणगी रु. ६,५०२/-**

सौ. सुप्रिया सुहास पोतनीस यांनी दि. ७.१.२०१७ रोजी रु. ६,५०२/- ची देणगी कै. मणिकराव लक्ष्मण पोतनीस (मार्गशिर्ष वद्य ५) कै. कृष्ण विनायक गोडबोले (पौष वद्य १) यांच्या पुण्यस्मरणार्थ दिलेली आहे. सदर देणगीचा विनियोग अनुक्रमे दि. ८.१.२०१७ रोजी आश्रमीय विद्यार्थ्यांना खिचडी देण्यासाठी करण्यात आला. तसेच दि. १३.१.२०१७ रोजी आश्रमीय विद्यार्थ्यांना जिलेबीसह संपूर्ण भोजन देण्यासाठी करण्यात आला.

**श्री. यशवंत प्रभाकर दुनाखे, पुणे**

**देणगी रु. ७,५००/-**

श्री. यशवंत प्रभाकर दुनाखे यांनी दि. ७.१.२०१७ रोजी रु. ७,५००/- ची देणगी कै. धनंजय प्रभाकर दुनाखे, कै. जयेश यशवंत दुनाखे यांच्या पुण्यस्मरणार्थ दिलेली आहे. सदर देणगीचा विनियोग दि. ९.१.२०१७ रोजी आश्रमीय विद्यार्थ्यांना मिष्टान्नासह संपूर्ण भोजन देण्यासाठी करण्यात आला.

**श्री. चंद्रकांत गोविंद भालेराव (मा. वि.) पुणे, देणगी रु. ८,५०१/-**



श्री.चंद्रकांत भालेराव

श्री. चंद्रकांत गोविंद भालेराव यांनी दि. ११.१.२०१७ रोजी रु. ८,५०१/- ची देणगी दिलेली आहे. सदर देणगी रु. ७,५००/- चा विनियोग दि. २९.३.२०१७ रोजी स्वतःच्या ७५व्या वाढदिवसा निमित्त आश्रमीय विद्यार्थ्यांना मिष्टान्नासह भोजन देण्यासाठी करण्यात आला. तसेच रु. १,००१/- चा विनियोग कै. सौ. राधाबाई गोविंद भालेराव यांच्या पुण्यस्मरणार्थ दि. २६.२.२०१७ रोजी सदर देणगीचा विनियोग आश्रमीय विद्यार्थ्यांच्या अन्नखर्चासाठी करण्यात येईल.

**श्री. दत्तात्रय बाळकृष्ण पटवर्धन, पुणे**

**देणगी रु. ५,००१/-**

श्री. दत्तात्रय बाळकृष्ण पटवर्धन यांनी दि. १३.१.२०१७ रोजी रु. ५,००१/- देणगी वडिल कै. बाळकृष्ण विश्वनाथ पटवर्धन, आई कै. शोभना बाळकृष्ण पटवर्धन, सासरे कै. नारायण विवेक जोशी, सासूबाई कै. लक्ष्मी नारायण जोशी यांचे पुण्यस्मरणार्थ दिलेली आहे. सदर देणगीचा विनियोग आश्रमीय विद्यार्थ्यांच्या अन्नखर्चासाठी करण्यात आला.

**श्री. सुनील दिगंबर पाटील, पुणे**

**देणगी रु. ७,८००/-**

श्री. सुनील दिगंबर पाटील यांनी दि. १३.१.२०१७ रोजी रु. ७,८००/- ची देणगी दिलेली आहे. सदर देणगीचा विनियोग संस्थेच्या इंदुमती वाचनायलामध्ये पुस्तके ठेवण्यासाठई कपाट खरेदीसाठी करण्यात आला.

**श्री. चंद्रकांत प्रभाकर देशपांडे, पुणे**

**देणगी रु. १०,०००/-**

श्री. चंद्रकांत प्रभाकर देशपांडे यांनी दि. १४.१.२०१७ रोजी रु. १०,०००/- ची देणगी मातोश्री कै. श्रीमती मंगला प्रभाकर देशपांडे यांच्या पुण्यस्मरणार्थ दिलेली आहे. सदर देणगीचा विनियोग दि. ९.७.२०१७ रोजी आश्रमीय विद्यार्थ्यांना गुलाबजाम मिष्टान्नासह संपूर्ण भोजन देण्यासाठी करण्यात येईल.

**श्री. केशव गजानन काळे, मुंबई**

**देणगी रु. ७,५००/-**

श्री. केशव गजानन काळे यांनी दि. १४.१.२०१७ रोजी रु. ७,५००/- ची देणगी दिलेली आहे. सदर देणगीचा विनियोग आश्रमीय विद्यार्थ्यांना मिष्टान्न मोतीचूर लाडूसह संपूर्ण भोजन देण्यासाठी करण्यात आला.

**देणगी रु. ४,००१/- ते रु. ५,०००/-**

**श्री. रामचंद्र दामोदर जोशी, पुणे**

**देणगी रु. ५,०००/-**

श्री. रामचंद्र दामोदर जोशी यांनी दि. २.१.२०१७ रोजी

रु. ५,०००/- ची देणगी वडिल कै. दामोदर गणेश जोशी यांचे पुण्यस्मरणार्थ दिलेली आहे. सदर देणगी व्याजाचा विनियोग प्रतिवर्षी आश्रम वसतीगृहातील इ. १०वी (एस.एस.सी.) परिक्षेत प्रथम येणाऱ्या विद्यार्थ्यास पारितोषिक देण्यासाठी करण्यात येईल.

**श्री. मधुकर रामचंद्र ठकार, पुणे**
**देणगी रु. ५,०००/-**

श्री. मधुकर रामचंद्र ठकार यांनी दि. २.१.२०१७ रोजी रु. ५,०००/- ची देणगी चि. सौ. का. मंजिरी मधुकर ठकार हिचे विवाहानिमित्त दिलेली आहे.

**श्रीमती मनिषा पी. करंदीकर, पुणे**
**देणगी रु. ५,०००/-**

श्रीमती मनिषा पी. करंदीकर यांनी दि. ९.१.२०१७ रोजी रु. ५,०००/- ची देणगी कै. आई व वडिलांचे स्मरणार्थ दिलेली आहे.

**श्री. मदन माधव मराठे (मा. वि.), पुणे**
**देणगी रु. ५,०००/-**

श्री. मदन माधव मराठे यांनी दि. ११.१.२०१७ रोजी रु. ५,०००/- ची देणगी मातोश्री कै. राधाबाई माधव मराठे यांचे पुण्यस्मरणार्थ दिलेली आहे. सदर देणगीचा विनियोग संस्थावाढीसाठी करण्यात आला.

**देणगी रु. ३,००१/- ते रु. ४,०००/-**

**श्री. रत्नाकर एकनाथ वैद्य व सौ. जयश्री रत्नाकर वैद्य, पुणे देणगी रु. ४,०००/-**



पद्मावती वैद्य



एकनाथ वैद्य

श्री. रत्नाकर एकनाथ वैद्य व सौ. जयश्री रत्नाकर वैद्य यांनी दि. ९.१.२०१७ रोजी रु. ४,०००/- ची देणगी मातोश्री कै. पद्मावती एकनाथ वैद्य (८ मार्च) व वडिल कै. एकनाथ केशव वैद्य (११ जानेवारी) यांच्या पुण्यस्मरणार्थ दिलेली आहे. सदर देणगी व्याजाचा विनियोग प्रतिवर्षी स्मृतिदिनी संस्थेच्या आश्रमीय विद्यार्थ्यांच्या अन्नखर्चासाठी करण्यात येईल.

**देणगी रु. २,००१/- ते ३,०००/-**

**श्री. सम्राट धनेश चित्राव, पुणे**
**देणगी रु. २,५००/-**

श्री. सम्राट धनेश चित्राव यांनी दि. ३.१.२०१७ रोजी रु. २,५००/- ची देणगी आजोबा कै. डॉ. रामचंद्र धोंडोपंत चित्राव यांच्या पुण्यस्मरणार्थ दिलेली आहे. सदर देणगीचा विनियोग ७ जानेवारी २०१७ रोजी आश्रमीय विद्यार्थ्यांना जिलेबी मिष्टान्न देण्यासाठी करण्यात आला.

**श्री. सतिश माधव लिमये, पुणे**
**देणगी रु. २,००१/-**

श्री. सतिश माधव लिमये यांनी दि. ७.१.२०१७ रोजी रु. २,००१/- ची देणगी कै. माधव त्रिंबक लिमये यांचे पुण्यस्मरणार्थ दिलेली आहे. सदर देणगीचा विनियोग दि. ८.१.२०१७ रोजी आश्रमीय विद्यार्थ्यांना गोड पदार्थ देण्यासाठी करण्यात आला.

**श्री. निसीम जेकब पालकर, पनवेल**
**देणगी रु. २,५००/-**

श्री. निसीम जेकब पालकर यांनी दि. ८.१.२०१७ रोजी रु. २,५००/- ची देणगी दिलेली आहे. सदर देणगी संस्थेच्या वाढीसाठी दिलेली आहे.

**श्री. ह. ना. पत्की, सोलापूर**
**देणगी रु. ३,०००/-**

श्री. ह. ना. पत्की यांनी दि. ९.१.२०१७ रोजी रु. ३,०००/- ची सदिच्छा देणगी दिलेली आहे.

**ॲड. एस. एन. चंद्रचुड (माजी विद्यार्थी) पुणे, देणगी रु. २,००२/-**

ॲड. एस. एन. चंद्रचुड यांनी दि. १४.१.२०१७ रोजी रु. २,००२/- ची देणगी प्रतिमहाप्रमाणे माहे डिसेंबर

२०१६ व माहे जानेवारी २०१७ साठी सदिच्छा देणगी दिलेली आहे.

**श्री. अशोक मार्तंड घाटपांडे व सौ. व श्री. प्रदीप प्रभाकर घुले, पुणे देणगी रु. २,००२/-**

श्री. अशोक मार्तंड घाटपांडे व सौ. व श्री. प्रदीप प्रभाकर घुले यांनी दि. १४.१.२०१७ रोजी रु. १,००२/- व दि. ७.१.२०१७ रोजी रु. १,००१/- अशी एकूण रु. २,००२/- ची देणगी कै. मार्तंड आत्माराम घाटपांडे (१७.१.२०१७) व कै. सुशिला मार्तंड घाटपांडे (१६.१.२०१७) यांच्या पुण्यस्मरणार्थ दिलेली आहे. सदर देणगीचा विनियोग आश्रमीय विद्यार्थ्यांना दि. १६.१.२०१७ रोजी उपमा / पोहे देण्यासाठी करण्यात आला व दि. १७.१.२०१७ रोजी मिष्टान्न देण्यासाठी करण्यात आला.

**देणगी रु. १,००१/- ते रु. २,०००/-**

**विद्या श्रीनिवास जोशी**

**देणगी रु. २,०००/-**

विद्या श्रीनिवास जोशी यांनी दि. ३.१.२०१७ रोजी रु. २,०००/- ची सदिच्छा देणगी दिलेली आहे.

**श्री. विश्वनाथ त्रिंबक राजर्षी, पुणे**

**देणगी रु. २,०००/-**

श्री. विश्वनाथ त्रिंबक राजर्षी यांनी दि. ५.१.२०१७ रोजी रु. २,०००/- सदिच्छा देणगी वर्षभरातील सुखद व दुःखद घटनांसाठी दिलेली आहे.

**श्री. चिं. पु. रत्नपारखी, मुंबई**

**देणगी रु. १,००१/-**

श्री. चिं. पु. रत्नपारखी यांनी दि. ५.१.२०१७ रोजी रु. १,००१/- ची देणगी मुलाच्या स्मरणार्थ दिलेली आहे. सदर देणगीचा विनियोग दि. १.२.२०१७ रोजी आश्रमीय विद्यार्थ्यांच्या अन्नखर्चासाठी करण्यात आला.

**श्रीमती शांता गोपाळ लागू, पुणे**

**देणगी रु. २,०००/-**

श्रीमती शांता गोपाळ लागू यांनी दि. ६.१.२०१७ रोजी रु. २,०००/- देणगी वडिल कै. गोपाळ नारायण लागू, बंधू कै. माधव गोपाळ लागू, कै. रामचंद्र गोपाळ लागू, कै. श्रीकृष्ण गोपाळ लागू यांचे पुण्यस्मरणार्थ दिलेली आहे. सदर देणगीचा विनियोग आश्रमीय विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक साहित्य खरेदीसाठी करण्यात आला.

**श्री. सदाशिव सखाराम पेंडसे, पुणे**

**देणगी रु. १,००१/-**

श्री. सदाशिव सखाराम पेंडसे यांनी दि. ११.१.२०१७ रोजी रु. १,००१/- ची सदिच्छा देणगी दिलेली आहे.

**श्री. विजय यशवंत ढेरे, पुणे**

**देणगी रु. १,५००/-**

श्री. विजय यशवंत ढेरे यांनी दि. १०.१.२०१७ रोजी रु. १,५००/- ची देणगी वडिल कै. यशवंत गोपाळ ढेरे यांच्या स्मृतिप्रित्यर्थ दिलेली आहे. सदर देणगीचा विनियोग दि. ११.१.२०१७ रोजी आश्रमीय विद्यार्थ्यांना सकाळी अल्पोपहारामध्ये पोहे / उपमा देण्यासाठी करण्यात आला.

**श्री. रामचंद्र श्रीपादराव पुणेकर, पुणे**

**देणगी रु. १,००१/-**

श्री. रामचंद्र श्रीपादराव पुणेकर यांनी दि. १२.१.२०१७ रोजी रु. १,००१/- ची देणगी वडिल कै. श्रीपादराव वामनराव पुणेकर यांच्या पुण्यस्मरणार्थ दिलेली आहे. सदर देणगीचा विनियोग पौष वद्य प्रतिपदा (१३.१.२०१७) रोजी आश्रमीय विद्यार्थ्यांच्या अन्नखर्चासाठी करण्यात आला.

**देणगी रु. ५००/- ते रु. १,०००/-**

**श्री. राजेंद्र प्रभाकर अवचट, पुणे**

**देणगी रु. १,०००/-**

श्री. राजेंद्र प्रभाकर अवचट यांनी दि. १-१-२०१७ रोजी रु. १,०००/- देणगी वडिल कै. प्रभाकर माधव अवचट (१ जानेवारी) व आजी कै. मैनाबाई माधव अवचट (२६ जानेवारी) यांच्या पुण्यस्मरणार्थ दिलेली आहे. सदर देणगीचा विनियोग स्मृतिदिनी आश्रमीय विद्यार्थ्यांच्या अन्नखर्चासाठी करण्यात आला.

**श्री. भालचंद्र प्रल्हाद बेलसरे, पुणे**
**देणगी रु. ५०१/-**

श्री. भालचंद्र प्रल्हाद बेलसरे यांनी दि. २.१.२०१७ रोजी रु. ५०१/- ची देणगी मातोश्री कै. पार्वतीबाई प्रल्हाद बेलसरे (पौष शुद्ध पंचमी), कै. प्रल्हाद नारायण बेलसरे (फाल्गुन शुद्ध दशमी), कै. केशव प्रल्हाद बेलसरे, कै. दत्तात्रय भगवंत कमलापुरकर, द्वारकाबाई दत्तात्रय कमलापुलकर यांच्या पुण्यस्मरणार्थ दिलेली आहे. सदर देणगीचा विनियोग दि. ३.१.२०१७ रोजी आश्रमीय विद्यार्थ्यांच्या अन्नखर्चासाठी करण्यात आला.

**श्री. अभिजित सुधीर दांडेकर, पुणे**
**देणगी रु. १,०००/-**

श्री. अभिजित सुधीर दांडेकर यांनी दि. ३.१.२०१७ रोजी रु. १,०००/- ची देणगी आई कै. सुप्रिया सुधीर दांडेकर यांच्या पुण्यस्मरणार्थ दिलेली आहे. सदर देणगीचा विनियोग दि. ३ जानेवारी २०१७ रोजी आश्रमीय विद्यार्थ्यांना सायंकाळी भोजनामध्ये गोड पदार्थ देण्यासाठी करण्यात आला.

**श्री. सतीश सदाशिव बेडगी, पुणे**
**देणगी रु. ५००/-**

श्री. सतीश सदाशिव बेडगी यांनी दि. ४.१.२०१७ रोजी रु. ५००/- ची देणगी मातोश्री कै. श्रीमती गंगुबाई सदाशिव बेडगी यांचे प्रथम वर्षश्राद्धानिमित्त दिलेली आहे. सदर देणगीचा विनियोग दि. ५.१.२०१७ रोजी आश्रमीय विद्यार्थ्यांच्या अन्नखर्चासाठी करण्यात आला.

**श्री. मुकुंद दत्तात्रेय दांडेकर, पुणे**
**देणगी रु. ५००/-**

श्री. मुकुंद दत्तात्रेय दांडेकर यांनी दि. ४.१.२०१७ रोजी रु. ५००/- ची देणगी कै. उमा दत्तात्रेय दांडेकर यांचे पुण्यस्मरणार्थ दिलेली आहे. सदर देणगीचा विनियोग दि. ४.१.२०१७ रोजी आश्रमीय विद्यार्थ्यांना मिष्टान्न देण्यासाठी करण्यात आला.

**श्रीमती वैजयंती व्ही. दांडेकर, रायगड**
**देणगी रु. ५००/-**

श्रीमती वैजयंती व्ही. दांडेकर यांनी दि. ५.१.२०१७ रोजी रु. ५००/- ची देणगी पितृस्मरणार्थ दिलेली आहे.

**श्री. अनिल मधुकर गोगटे, पुणे**
**देणगी रु. १,०००/-**


प्रभा गोगटे

श्री. अनिल मधुकर गोगटे यांनी दि. ५.१.२०१७ रोजी रु. १,०००/- ची देणगी कै. प्रभा मधुकर गोगटे यांच्या पुण्यस्मरणार्थ दिलेली आहे. सदर देणगीचा विनियोग दि. ६.१.२०१७ रोजी आश्रमीय विद्यार्थ्यांच्या अन्नखर्चासाठी करण्यात आला.

**श्री. सोपान गणपत साळी, पुणे**
**देणगी रु. ५००/-**

श्री. सोपान गणपत साळी यांनी दि. ६.१.२०१७ रोजी रु. ५००/- ची देणगी कै. सौ. प्रतिभा सोपान साळी यांच्या पुण्यस्मरणार्थ दिलेली आहे. सदर देणगीचा विनियोग दि. २.१२.२०१७ रोजी आश्रमीय विद्यार्थ्यांना मिष्टान्न देण्यासाठी करण्यात आला.

**श्री. राजेंद्र संपत कांबळे (मा. वि.), पुणे**
**देणगी रु. ५००/-**

श्री. राजेंद्र संपत कांबळे यांनी दि. ७.१.२०१७ रोजी रु. ५००/- ची देणगी आई कै. सुभद्रा संपत कांबळे यांचे स्मरणार्थ दिलेली आहे. सदर देणगीचा विनियोग दि. ७ जानेवारी २०१७ रोजी आश्रमीय विद्यार्थ्यांना मिष्टान्न देण्यासाठी करण्यात आला.

**अपर्णा सरपोतदार, पुणे**
**देणगी रु. १,०००/-**

अपर्णा सरपोतदार यांनी दि. ९.१.२०११७ रोजी रु. १,०००/- ची देणगी कै. विनायक दाते यांच्या पुण्यस्मरणार्थ दिलेली आहे. सदर देणगीचा विनियोग दि. १०.१.२०१७ रोजी आश्रमीय विद्यार्थ्यांना मिष्टान्न देण्यासाठी करण्यात आला.

**श्री. राहुल सुरेश भुतडा व श्री. तेजस ऐलादपूरकर, पुणे, देणगी रु. १,०००/-**


हरिष भुतडा

श्री. राहुल सुरेश भुतडा व श्री. तेजस ऐलादपूरकर यांनी दि. ९.१.२०१७ रोजी रु. १,०००/- ची देणगी कै. हरिष सुरेश भुतडा यांच्या पुण्यस्मरणार्थ दिलेली आहे. सदर देणगीचा विनियोग दि. १० जानेवारी २०१७ रोजी आश्रमीय विद्यार्थ्यांच्या अन्नखर्चा साठी करण्यात आला.

**श्री. उल्हास चिंतामण खिरे, पुणे**

**देणगी रु. ६००/-**

श्री. उल्हास चिंतामण खिरे यांनी दि. १०.१.२०१७ रोजी रु. ६००/- ची देणगी वडिल कै. चिंतामण गणेश खिरे यांच्या पुण्यस्मरणार्थ दिलेली आहे. सदर देणगीचा विनियोग दि. १२.१.२०१७ रोजी आश्रमीय विद्यार्थ्यांच्या अन्नखर्चासाठी करण्यात आला.

**सौ. मृणाल मंगेश ढवळे, पुणे**

**देणगी रु. १,०००/-**

सौ. मृणाल मंगेश ढवळे यांनी दि. ११.१.२०१७ रोजी रु. १,०००/- ची देणगी कै. जे. पी. पाध्ये, कै. ए. जे. पाध्ये यांचे पुण्यस्मरणार्थ दिलेली आहे. सदर देणगीचा विनियोग दि. १२.१.२०१७ रोजी आश्रमीय विद्यार्थ्यांच्या अन्नखर्चासाठी करण्यात आला.

**श्री. शामराव मेघनाथ लकडे, पुणे**

**देणगी रु. ५०१/-**

श्री. शामराव मेघनाथ लकडे यांनी दि. १२.१.२०१७ रोजी रु. ५०१/- ची देणगी आई कै. प्रमिलाबाई मेघनाथ लकडे यांचे पुण्यस्मरणार्थ दिलेली आहे. सदर देणगीचा विनियोग दि. १२ जानेवारी २०१७ रोजी आश्रमीय विद्यार्थ्यांना मिष्टान्न देण्यासाठी करण्यात आला.

**श्री. हेमंत गंगाधर साने, पुणे**

**देणगी रु. ५००/-**

श्री. हेमंत गंगाधर साने यांनी दि. १२.१.२०१७ रोजी रु. ५००/- ची देणगी कै. सरलाबाई गंगाधर साने यांच्या स्मृतिप्रित्यर्थ दिलेली आहे. सदर देणगीचा विनियोग दि. १३ जानेवारी २०१७ रोजी आश्रमीय विद्यार्थ्यांच्या अन्नखर्चासाठी करण्यात आला.

**देणगी रु. ४९९/-खालील सर्व देणग्या**

श्री. नारायण त्रिंबक दाबके, रत्नागिरी, रु. २५/-, श्री. गंगाधर चिंतामण दाभाडे, पुणे, रु. १०१/-, सौ./श्री. संजय श्रीधर केळकर, पुणे, रु. १०१/-, श्री. धनंजय केशव गद्रे, पुणे, रु. ३००/- डॉ. शं. शे. मराठे, पुणे, रु. १०/- श्री. प्रफुल्ल रामचंद्र भणगे, पुणे, रु. २५१/-

**वस्तुरूप देणग्या मुल्य रु. अंदाजे**

श्री. विनित चिंतामणी सुदुंबरेकर, पुणे जिलेबी १ कि. रु. १५०/-; श्री. प्रकाश शिवमूर्ती गडकरी, पुणे तांदुळ ८ कि. रु. २५०/-; श्री. विनायक धाना, पुणे पुरी, मिक्स भाजी, भात, भजी रु. ५००/-; श्री. सोपान गणपत साळी, पुणे शाल ९ नग, टॉवेल १ नग, व जुने कपडे, रु.१,१००/-; श्री. प्रशांत मंत्रवादी, पुणे आश्रमीय विद्यार्थ्यांना शाळेचा नवीन गणवेश व स्वेटर, रु. ८५०/-; श्री. अरविंद काशिनाथ राजहंस, पुणे तांदुळ २० कि., साखर १० कि., रवा १० कि., तुप ८ कि., तुरडाळ ५ कि., गूळ २० कि. रु. ३,५००/-; श्री. सतीश दत्तोपंत कुलकर्णी, पुणे नारळ ४५ नग, रु.५००/-; श्रीमती मालती एकनाथ शेटे, पुणे राजगिरा वडी १ कि., अगरबत्ती १ पुडा रु. २००/-; श्री. अभिषेक नुलकर, पुणे जुने कपडे १० शर्ट २ पँट, चॉकलेट २० नग रु. २५०/-; डॉ. अरुण श्रीनिवास किनरे, पुणे सामोसे १८० नग रु. १,५००/-; सौ. स्मिता अरुण किनरे, पुणे गुलाबजाम ३ कि. रु.७००/-

## स्मृतिदिन

**सर्व कै.**

वासुदेव पांडुरंग खाडिलकर, पुरुषोत्तम रामचंद्र भातखंडे, किशोर मनोहर वाळिंबे, दिनकर दत्तात्रय दातार, हरिश्चंद्रराव आनंदराव तालचेरकर, वामन दामोदर गोवईकर, नारायण नरहर गोखले, माया राणी शर्मा, कमलाबाई कृष्णाजी ठोसर, राधाबाई कृष्णाजी कर्वे, पुरुषोत्तम त्रिंबक परांजपे, शशिकला पुरुषोत्तम परांजपे, शरदचंद्र यशवंत रणदिवे, श्रीनिवास अनंत देशपांडे, सुमती घनःशाम सोवनी, यज्ञेश्वर गंगाधर गोडबोले, रामचंद्र गणेश देशपांडे, वामन देवराम देशमुख, वामन धोंडो कढे, विष्णू नाना पन्हाळे, केशवराव विनायक दात्ये, दिनकरराव बाबुराव पवार, महर्षी विठ्ठल रामजी शिंदे, धोंडो रामचंद्र गोखले, कृष्णाजी मोहिनीराज देशपांडे, ह. भ. प. गणपत दशरथ घोळवे, जानकीबाई रघुनाथ जोगळेकर, रामचंद्र अनंतराव मुंगी, कै. वामन गणेश रानडे, सुधाकर मनोहर रेंधे, सरस्वतीबाई गणेश जोशी, सरस्वतीबाई चिंतामण गोगटे, रंगनाथ हरी बरीदे, अन्नपूर्णाबाई नारायण दामले, गोविंद महादेव बापट, दिवाकर दिनकर मनोहर, वत्सला दत्तात्रेय फाटक, लक्ष्मीबाई जगन्नाथ वाघ, गणेश विश्वनाथ भागवत, केशव बाळकृष्ण गद्रे, सौ. माणिक भार्गवराव फणसे, सुर्यकांत वासुदेव मोहोळकर, सतिश मेहता, अशोक नारायण कुलकर्णी, वामन विश्वनाथ आगाशे, जयंत त्रिंबक अभ्यंकर, वामन विष्णु भुपटकर, लक्ष्मणराव बाबुराव पाडळकर, दिगंबर रामकृष्ण महाजन, बापु आप्पाजी संत, मधुकर कृष्णाजी पानसे, श्रीमती मालती गजानन देव, यशोदा गणेश पारूंडेकर, धोंडुबाई गणपती भोसले, गोपाळ सिताराम गोखले, मधुकर गंगाधर फडके, पार्वतीबाई माधवराव मोघे, जानकी कृ. नायर, दत्तात्रय चिंतामण गोखले, लक्ष्मण विनायक तावरे, वासुदेव सिताराम पेंडसे, दत्तात्रय पांडुरंग किंजवडेकरशास्त्री, लक्ष्मण महादेव चाफेकर, सदाशिव रामदास गंधे, द. ग. गोडसे, नारायण लक्ष्मण प्रधान, गोविंद श्रीधर गोरे, माधव गंगाधर जोशी, सुधा माधव जोशी, पांडुरंग वासुदेव परांजपे, नारायण केशव पटवर्धन, भास्कर विश्वनाथ गोखले, सौ. इंदुमती भालचंद्र वैशंपायन, दिनकर शंकर जोशी (माजी विद्यार्थी), उत्तमराव राणोपंत कुलकर्णी, सदाशिव तमण्णा पुजारी, सौ. विद्या शंकर पाठक , दत्तोपंत भिमराव कुलकर्णी, स्नेहल दत्तात्रय देशपांडे, शिवराम दिनकर पटवर्धन, विमल दत्तात्रय गाडगीळ, सुशिला राजाराम कोकणे, सौ. मिराताई बायस, सौ. प्रमिला चिंतामण दातार, मधुकर नारायण गोरे, राधाबाई नारायण अत्रे, राधाबाई नारायण आपटे, दमयंती रामकृष्ण मेंगाळे, श्रीमती राधाबाई केशव फणसळकर, विनायक रामचंद्र गोखले, दत्तात्रय गणेश आगाशे, नारायण दत्तात्रय फडके, दिगंबर बाळकृष्ण दाणी, दत्तात्रय रामचंद्र चिपळुणकर, सौ. सुनीता भालचंद्र पटवर्धन, शकुंतला सदाशिव आठवले, माधव श्रीकृष्ण टोणगावकर, जनार्दन माधवराव उर्फ आबासाहेब पोतनीस, सुशिला दिगंबर दाणी, सुशिला मधुकर कुलकर्णी, पं. मोहन तथा भालचंद्र नीळकंठ कर्वे, मंगेश मोहनीराज जोशी, सरोष कैखुशरू इराणी, सौ. शीला उर्फ सुहास रामचंद्र दक्षिणदास, श्रीधर नारायण टिळक, ज. न. खांडेकर, सौ. देवयानी घाटे, जगन्नाथ नानाजी ढवळीकर, अनंत व्यंकटेश सुखदेव, प्रल्हाद रामकृष्ण मेहेंदळे, रामचंद्र नामदेवराव झोळ, पुरूषोत्तम कृष्णाजी सोमण, नीळकंठ दत्तात्रय जोशी, गजानन दत्तात्रय गाडगीळ, विष्णु विठ्ठल काळे, नारायण गंगाधर गोखले, इंदिराबाई कृष्णाजी लिमये, भास्कर उत्तम कवडीवाले, लक्ष्मीबाई विनायक सोमण, बाबुराव गोपाळराव औरंगाबादकर, सत्यभामाबाई दत्तात्रय करमरकर, सुशिला आत्माराम गोखले, नलिनी मधुकर परळीकर, शांताराम रंगनाथ गोंधळेकर, डॉ. माधव विष्णू पेंडसे, अॅड. दत्तात्रय कृष्ण पद्मनाभी, भास्कर मुरलीधर दाते, सरदार दत्ताजी राणोजी शिंदे, भगवंत रघुनाथ जुन्नरकर, पंढरीनाथ गोविंद पेठकर, दामोदर दत्तात्रय तळवलकर, रघुनाथ विठ्ठल बुरसे, माधव विश्वनाथ आठवले, काशिनाथ विनायक खाडिलकर, केशव हणमंत फडके, श्रीमती अलका वसंत जोशी, दत्तात्रय विष्णु खाडिलकर, शंकर गोविंद शेंडे, सदाशिव त्र्यंबक धनेश्वर, यशवंत दिगंबर खैर, कृष्णराव वा.

दामले, अनिरूद्ध विनायक कुलकर्णी, एकनाथ रामचंद्र शेटे, एकनाथ केशव वैद्य, मोरो हरि वैद्य, गंगाबाई विश्वनाथ जोग, दत्तात्रय गणेश सावरकर, रघुनाथ हरि आफळे, कमलाकर कृष्ण सोमण, सुधा कमलाकर सोमण, राजाभाऊ क्षीरसागर, गंगाधर गोविंद जोशी, सरदार गोविंद बळवंत पटवर्धन उर्फ दाजीसाहेब पटवर्धन, सुशिलाबाई दत्तात्रय चिंचोरे, सौ. शैलजा पुरुषोत्तम जोगळेकर, सौ. लक्ष्मी यशवंत देवस्थळे, द्वारकाबाई अनंत ओझरकर, वासुदेव काशिनाथ वैद्य व पूर्वज, इंदिराबाई मनोहर रेंघे, परशुराम त्र्यंबक विद्वांस, जयराम वासुदेव भागवत, सरला विश्वनाथ दाते, सदाशिवराव श्रीपतराव साठे, कुमार गंधर्व, कॅप्टन माधव गणेश जोशी, इंदिरा दाजी बिवलकर, डॉ. पांडुरंग वामन दाबके, मदन जनार्दन रिसबूड, त्रिंबक रामचंद्र जोशी, सौ. रमा दत्तात्रय जोशी, बळवंत गुरूनाथ सहस्त्रबुध्दे, वासुदेव गोविंद आपटे, रामचंद्र विष्णु जोग, पं. पुरुषोत्तम वालावलकर, बाबुराव गोपाळराव औरंगाबादकर, नटवर्य प्रभाकर पणशीकर, इंदूमती शंकर पंडीत, पांडुरंग कृष्ण साने, सौ. लिला केशव पाटील, मंदाकिनी विश्वनाथ आगाशे, डॉ. प्रभाकर सदाशिव गोखले, सुलभा पांडुरंग गोखले, नरहर विठ्ठल भागवत, कृष्णाजी नारायण ठकेकर, श्रीपादराव वामनराव पुणेकर, यशवंत दाजी बाम, मथुराबाई त्रिंबक जोशी, वासुदेव गोविंद तट्टू, सवीता चिंतामणराव गुळाणीकर, सौ. रोहिणी मनोहर जोशी, पार्वतीबाई शंकरराव शिंदे, अनंत दिनकर ताम्हणकर, इंदिराबाई विष्णु आगाशे, लक्ष्मीबाई उर्फ चंपूताई नगरकर, सरदार यशवंतराव आनंदराव पवार, श्रीमंत सदाशिवराव चिमाजी आप्पा पेशवा, श्रीमंत विश्वासराव बाळाजी पेशवा, पानिपत वीर - सैनिक, सरदार मानाजी पायगुडे, गोविंदराव गोपाळराव टोकेकर, विश्वनाथ नारायण भागवत, श्रीराम कृ. वैध, दीनानाथ डी. दलाल, सुमती यशवंत गोखले, दिलीप प्रभाकर भिडे, सुशिलाबाई श्रीधर टिळक, बाळकृष्ण अनंत औटी, मोरेश्वर हेरंब देव, गोविंद भगवान करी, गोपाळ सीताराम गोखले, कमला गजानन वाघ, विनायक गणेश वाघ, सौ. राधाबाई दत्तात्रय राजवाडे, डॉ. राजाराम नारायण फडके, गोपाळ सीताराम गोखले, गोविंद गोपाळ नातू, लक्ष्मीबाई सखाराम अितकरकर, दत्तात्रय भास्कर बर्वे, विठ्ठल चंद्रभान जंगलेपाटील (मा.वि.), कमला गजानन वाघ

**जयंती**

माधव सदाशिव दात्ये, विष्णु विश्वनाथ गोखले, शंकर लक्ष्मण चोरघडे, शशिकला दत्तात्रय गळंगे, सुहासिनी शंकर चोरघडे, उषा काशिनाथ आडकर, रामचंद्र दत्तात्रय लेले

**वाढदिवस**

सौ शारदा मारूती घडशी, श्री. कृष्णाजी चिंतामण सरदेशमुख, चि. गिरीजा अमित गोरे

***


# विज्ञानावरील उपयुक्त पुस्तके

| | |
|---|---|
| १) शास्त्रीय उपकरणे व प्रयोग-भाग १ ते ४ | द्वा. वा. केळकर |
| २) विज्ञान रंजन कथा भाग १ ते २ | विवेक भालेराव |
| ३) जिज्ञासा विज्ञानाची भाग १ व २ | विवेक भालेराव |
| ४) खेळातील विज्ञान | डॉ. पां. वि. चंद्रात्रेय |
| ५) सूर्य एक तोंड ओळख | वसंत पां. नेने |
| ६) ढगांचे विज्ञान | वसंत पां नेने |
| ७) मुलांचे आकाश निरीक्षण | सुधाकर भालेराव |
| ८) विज्ञान शतपत्रे | सुधाकर भालेराव |

**पुणे विद्यार्थी गृह प्रकाशन**

१७८६ सदाशिव पेठ, पुणे ३०

## हितचिंतक व आश्रयदाते यांच्या मदतीचे वृत्त, पुणे विभाग

**कोषाध्यक्ष – श्री. राजेंद्र बोऱ्हाडे** **संचालक – श्री. कृष्णाजी कुलकर्णी**

**दि. १६.१.२०१७ ते ३१.१.२०१७**

**पुढील देणगीदारांनी संस्थेला देणगी देऊन सक्रिय सहाय्य केलेले आहे. संस्थेविषयी असलेल्या आत्मीयतेबद्दल सर्वांचे आभारी आहोत.**

**देणगी रु. १०,०००/- वरील सर्व**

### श्रीमती अनिता अशोक जोशी, पुणे देणगी रु. १,५०,०००/-

श्रीमती अनिता अशोक जोशी यांनी दि. १८.१.२०१७ रोजी रु. १,००,०००/- ची देणगी पति कै. अशोक बाळूराव जोशी यांच्या पुण्यस्मरणार्थ दिलेली आहे. सदर देणगी रु. १,००,०००/- च्या व्याजाचा विनियोग प्रतिवर्षी २६ जून रोजी आश्रमीय गरीब, गरजु, हुशार किंवा आई व वडिल नसलेल्या विद्यार्थ्यांना शैक्षणिक मदत देण्यासाठी करण्यात येईल. तसेच उर्वरित रु. ५०,०००/- कै. बाळूराव हरीराव जोशी (५ एप्रिल), तसेच कै. सुधा बाळूराव जोशी (१ जुलै) यांच्या पुण्यस्मरणार्थ प्रत्येकी रु. २५,०००/- देणगी दिलेली आहे. देणगी रु. ५०,०००/- च्या व्याजाचा विनियोग प्रतिवर्षी संबंधितांचे स्मृतिदिनी आश्रमीय विद्यार्थ्यांना मिष्टान्न देण्यासाठी करण्यात येईल.

### श्रीमती गीता दिलिप अत्रे, पुणे देणगी रु. १,०७,५००/-

